म. ग्रं. [illegible] चनालय, [illegible]
विषय [illegible]
दा. क्र. २९८०४

१

इतिहासातील

# अनमोल मोती

मा. गो. काटकर

BVBK-0402974

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग पहिला

निवेदक

मा. गो. काटकर

[illegible]
[illegible]
[illegible] दिनांक [illegible]
विषय [illegible]

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

BVBK-0402974

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
**वीस रुपये**

## निवेदन

*कुमार मित्रांनो!*
*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्‌बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

# कथाक्रम

| | | |
|---|---|---|
| १) | पाटलीपुत्र नगराची कथा | ३ |
| २) | साहसी श्रीदत्त | ७ |
| ३) | महाकविराज गुणाढ्य | २० |
| ४) | मित्र असावा असा | २८ |
| ५) | देवाची देणगी | ३२ |
| ६) | दुष्कर्माचे फळ | ३८ |
| ७) | चतुर उंदीर | ४१ |
| ८) | आश्चर्याची कथा | ४३ |
| ९) | भक्तीचा प्रसाद | ४६ |

# पाटलीपुत्र नगराची कथा

हरिद्वारजवळ गंगानदीच्या काठी कनखल नांवाचे एक पवित्र क्षेत्र आहे. फार वर्षापूर्वी तिथे एक दाक्षिणात्य ब्राह्मण आपल्या पत्नीसह तप करीत राहिला होता. त्याला तीन मुलगे होते. ते आपल्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर विद्या मिळविण्याकरिता राजगृह नावाच्या नगरास गेले. तिथे त्यांनी विद्या संपादन केली. पुढे ते कार्तिकस्वामीच्या दर्शनासाठी दक्षिणेकडे गेले असता चिंचिनी नावाच्या नगरात एका ब्राह्मणाकडे उतरले. त्या ब्राह्मणाला फक्त तीन मुली होत्या. त्या त्याने धनासहित तिघा भावांना दिल्या. नंतर तो ब्राह्मण तप करण्यासाठी गंगा तीराकडे निघून गेला.

पुढे त्या प्रांतात एके वर्षी भयंकर दुष्काळ पडला. तेव्हा आपल्या भार्यांचा त्याग करून ते तिघे भाऊ दूर देशी निघून गेले. त्यावेळी मधल्या भावाची बायको गरोदर होती. अशा निराधार व कठीण परिस्थितीत एकटे राहाणे धोक्याचे होते म्हणून त्या तिघी बहिणी यज्ञदत्त नावाच्या आपल्या पित्याच्या मित्राकडे आश्रयार्थ गेल्या. तिथे उदरनिर्वाहासाठी काबाडकष्ट करू लागल्या. आज नाही उद्या आपले नवरे परत येतील आणि पुनः आपल्याला सुखाचे दिवस येतील या आशेवर त्या जगू लागल्या. योग्य समयी मधली बहीण प्रसूत झाली. तिला मुलगा झाला. तो तिघीही बहिणींचा जीव की प्राण झाला.

एकदा श्रीशंकर पार्वतीसह आकाशमार्गाने जात असताना पार्वतीने त्या बालकास पाहिले. त्याची तिला दया येऊन ती शंकरास म्हणाली, 'देवाधिदेवा, त्या लहान मुलावर त्या तिघी बहिणी किती प्रेम करीत आहेत ! तो पुढे आपल्याला सुखी करील अशी आशा त्यांच्या मनात आहे. म्हणून त्यांची इच्छा पुरी होईल, असे करा !' असे पार्वतीचे दयार्द्र बोलणे ऐकून शंकर म्हणाले, 'देवी, माझ्याही मनात तोच विचार आहे. पूर्वजन्मी त्याने आपल्या पत्नीसह माझी भक्ती केली होती. त्या सुकृताचे फळ भोगण्याकरिता त्याचा जन्म झाला

आहे. तो राजा होईल. आणि महेंद्रवर्ण राजाच्या मुलीशी त्याचा विवाह होईल.' असे बोलून शंकराने त्या तिघी बहिणींना स्वप्नात सांगितले, 'तुमचा मुलगा पुत्रक या नावाने प्रसिद्ध होईल. तो झोपून उठला म्हणजे त्याच्या उशाशी एक लक्ष सुवर्णमुद्रा दररोज सापडतील. त्यामुळे तो खूप धनवंत होऊन राजा होईल.'

सकाळी उठल्यावर त्या तिघी बहिणींना झोपेतून जागा झालेल्या मुलाच्या उशाशी एक लक्ष सुवर्णमुद्रा आढळल्या तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. दिवसेंदिवस पुत्रकाच्या शरीराबरोबर त्यांची संपत्तीही वाढू लागली. अखेर एके दिवशी पुत्रकाला राजपद प्राप्त झाले. त्यानंतर काही दिवसांनी यज्ञदत्त पुत्रकाला म्हणाला; 'पुत्रका, दुष्काळाला कंटाळून तुझे वडील आणि दोघे चुलते परागंदा झाले आहेत. तेव्हा तू विद्वान व गरीब ब्राह्मणास द्रव्यदान करण्यास सुरुवात कर म्हणजे कदाचित द्रव्यलोभानं तुझे वडील व चुलते इथं येतील.' पुत्रकास यज्ञदत्ताची कल्पना पसंत पडली. त्याप्रमाणे त्याने दान देण्यास आरंभ केला. ती वार्ता ऐकून दूरदूरच्या याचकाप्रमाणे पुत्रकाचे वडील व चुलतेही आले. तेव्हा लोकांनी व त्यांच्या पत्नींनी त्यांना ओळखले. सर्वांना फार आनंद झाला. याचक म्हणून राजवाड्यात आलेल्या पुत्रकाचे वडील व चुलते यांना अनायासे राजलक्ष्मी व गृहलक्ष्मींचा लाभ झाला.

पण काय आश्चर्य! सदाचरणाने सर्व आपत्तींचा नाश होतो याचा प्रत्यक्ष अनुभव आला तरीही दुष्ट माणसांचा स्वभाव बदलत नाही. काही दिवसांनी त्या तिघा भावांच्या मनात राज्यलोभ निर्माण झाला आणि त्यांनी पुत्रकास ठार मारून टाकण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे ते पुत्रकास बरोबर घेऊन विंध्यवासिनी देवीच्या दर्शनास गेले. देवीच्या गाभाऱ्यात त्यांनी आधीच मारेकऱ्यांना बसवून ठेवले होते. मंदिराजवळ गेल्यावर ते दुष्ट पुत्रकाला म्हणाले, 'देवीचे दर्शन घेण्याकरिता तू आधी एकटाच आत जा', 'ठीक आहे', असे म्हणून पुत्रक विश्वासाने व निःशंकपणे देवीच्या गाभाऱ्यात गेला. तेथे आपला वध करण्यास सज्ज असलेले मारेकरी पाहून पुत्रकाने गंभीरपणे व निर्भयतेने त्यांना विचारले, 'तुम्ही मला कशाकरिता व कोणाच्या सांगण्यावरून मारणार आहात ?' तेव्हा देवीच्या प्रभावाने मोहित झालेल्या मारेकऱ्यांनी सर्व हकीकत पुत्रकाला सांगितली. मोठ्या दुःखित मनाने ती ऐकून पुत्रक म्हणाला,

'मला मारू नका. माझ्या अंगावरले सर्व मौल्यवान अलंकार मी तुम्हाला देतो आणि दूर कुठंतरी निघून जातो. मी कुणालाही काही मुळीच सांगणार नाही.' 'बरं आहे,' असे म्हणून मारेकऱ्यांनी पुत्रकाने दिलेले सर्व अलंकार घेतले व मंदिराबाहेर उभे असलेले तिघेही राज्यलोभी मोठ्या आनंदाने नगराकडे परत गेले. पण काही दिवसांनी मंत्र्यानी त्या कृतघ्न लोभ्यांना मारून टाकले. कृतघ्न माणसांचे कल्याण कसे होणार ?

स्वतःच्या पित्याच्या आणि चुलत्याच्या विश्वासघातकीपणाने अतिशय खिन्न झालेला बिचारा पुत्रक विंध्यारण्यात भटकू लागला. तेव्हा एका ठिकाणी त्याला दोन पुरुष युद्धाच्या तयारीने उभे राहिलेले दिसले. पुत्रकाने त्यांना विचारले; 'तुम्ही कोण ? युद्धासाठी का तयार झालात ?' 'आम्ही मायासुराचे पुत्र आहोत', असे सांगून जमिनीवरील एक पात्र, एक काठी व दोन पादुका यांच्याकडे हात करून ते पुढे म्हणाले, 'या वस्तू ही आमच्या वडिलांची संपत्ती आहे. आम्हा दोघांच्या झुंजीत जो विजयी होईल तो या संपत्तीचा मालक होणार आहे.' असे त्यांचे बोलणे ऐकून पुत्रक हसून हणाला, 'खरंच तुम्ही किती वेडे आहात ! या क्षुद्र वस्तूंसाठी तुम्ही एकमेकाचा नाश करण्यास तयार झालात ?' 'भल्या माणसा', ते मायासुरपुत्र म्हणाले; 'या वस्तू सामान्य नाहीत. त्या अद्‌भुत आहेत. या पादुका पायात घातल्या की आकाशातून इच्छा असेल तिथं जाता येतं. या काठीनं जे लिहावे ते खरं होतं आणि या पात्रात इच्छिलेला आहार निर्माण होतो.' 'अस्सं !' पुत्रक काहीशा आश्चर्याने म्हणाला; 'आता युद्ध न करता मी सांगतो तसं करा. तुम्ही दोघेही धावा. जो पुढे जाईल त्याची ही संपत्ती.' ही पुत्रकाची कल्पना त्या मूर्ख असुरांना पसंत पडली. ते वेगाने धावू लागले. तेवढ्यात पुत्रकाने काठी व पात्र हाती घेतले आणि पादुका पायात घालून आकाशात गमन गेले.

एका क्षणामध्ये खूप दूर गेल्यावर पुत्रकाला एक सुंदर नगर दिसले. त्याचे नाव आकर्षिका असे होते. त्या नगरात पुत्रक उतरला. आता कुठे जावे असा विचार करीत चालताना तो एका बाजूस असलेल्या एका पडक्या घराजवळ गेला. त्या घरात एक म्हातारी बाई राहात होती. पुत्रकाने तिला थोडे द्रव्य दिले आणि तिच्या घरी मुक्काम ठोकला. त्या नगराच्या राजाचे नाव

'मला मारू नका. माझ्या अंगावरले सर्व मौल्यवान अलंकार मी तुम्हाला देतो आणि दूर कुठंतरी निघून जातो. मी कुणालाही काही मुळीच सांगणार नाही.' 'बरं आहे,' असे म्हणून मारेकऱ्यांनी पुत्रकाने दिलेले सर्व अलंकार घेतले व मंदिराबाहेर उभे असलेले तिघेही राज्यलोभी मोठ्या आनंदाने नगराकडे परत गेले. पण काही दिवसांनी मंत्र्यानी त्या कृतघ्न लोभ्यांना मारून टाकले. कृतघ्न माणसांचे कल्याण कसे होणार ?

स्वतःच्या पित्याच्या आणि चुलत्याच्या विश्वासघातकीपणाने अतिशय खिन्न झालेला बिचारा पुत्रक विंध्यारण्यात भटकू लागला. तेव्हा एका ठिकाणी त्याला दोन पुरुष युद्धाच्या तयारीने उभे राहिलेले दिसले. पुत्रकाने त्यांना विचारले; 'तुम्ही कोण ? युद्धासाठी का तयार झालात ?' 'आम्ही मायासुराचे पुत्र आहोत', असे सांगून जमिनीवरील एक पात्र, एक काठी व दोन पादुका यांच्याकडे हात करून ते पुढे म्हणाले, 'या वस्तू ही आमच्या वडिलांची संपत्ती आहे. आम्हा दोघांच्या झुंजीत जो विजयी होईल तो या संपत्तीचा मालक होणार आहे.' असे त्यांचे बोलणे ऐकून पुत्रक हसून हणाला, 'खरंच तुम्ही किती वेडे आहात ! या क्षुद्र वस्तूंसाठी तुम्ही एकमेकाचा नाश करण्यास तयार झालात ?' 'भल्या माणसा', ते मायासुरपुत्र म्हणाले; 'या वस्तू सामान्य नाहीत. त्या अद्भुत आहेत. या पादुका पायात घातल्या की आकाशातून इच्छा असेल तिथं जाता येतं. या काठीनं जे लिहावे ते खरं होतं आणि या पात्रात इच्छिलेला आहार निर्माण होतो.' 'अस्सं !' पुत्रक काहीशा आश्चर्याने म्हणाला; 'आता युद्ध न करता मी सांगतो तसं करा. तुम्ही दोघेही धावा. जो पुढे जाईल त्याची ही संपत्ती.' ही पुत्रकाची कल्पना त्या मूर्ख असुरांना पसंत पडली. ते वेगाने धावू लागले. तेवढ्यात पुत्रकाने काठी व पात्र हाती घेतले आणि पादुका पायात घालून आकाशात गमन गेले.

एका क्षणामध्ये खूप दूर गेल्यावर पुत्रकाला एक सुंदर नगर दिसले. त्याचे नाव आकर्षिका असे होते. त्या नगरात पुत्रक उतरला. आता कुठे जावे असा विचार करीत चालताना तो एका बाजूस असलेल्या एका पडक्या घराजवळ गेला. त्या घरात एक म्हातारी बाई राहात होती. पुत्रकाने तिला थोडे द्रव्य दिले आणि तिच्या घरी मुक्काम ठोकला. त्या नगराच्या राजाचे नाव



महेन्द्रवर्ण असे होते. त्याला पाटली नावाची एक अतिशय सुंदर मुलगी होती. देवीने स्वप्नात येऊन सांगितल्याप्रमाणे राजा महेंद्रवर्णाने पुत्रकाबरोबर पाटलीचा विवाह घडवून आणला. लग्नानंतर पुत्रक पाटलीला घेऊन पादुकांच्या साह्याने आकाश मार्गाने निघाला. खूप दूर गेल्यावर आपली सुकुमार पत्नी थकली आहे असे पुत्रकाला दिसले, म्हणून तो गंगानदीच्या तीरावर उतरला. तिथे त्याने जवळ असलेल्या पात्राच्या साह्याने हवे ते भोजनाचे पदार्थ उत्पन्न केले. भोजन करून पाटली व पुत्रक दोघेही तृप्त व आनंदित झाले. नंतर पाटलीच्या विनंतीवरून पुत्रकाने हातातील काठीने गंगातीरावर परिपूर्ण व चतुरंगदळयुक्त असे नगर रेखाटले. त्याबरोबर प्रत्यक्षात तसेच नगर तिथे निर्माण झाले. पुत्रक त्या नगराचा राजा झाला. पुढे स्वपराक्रमाने तो समुद्रवलयांकित पृथ्वीचा स्वामी झाला.

अशा प्रकारे मायेने रचलेले ते नगर पाटली आणि पुत्रक यांच्या नावावरून 'पाटलीपुत्र' म्हणून प्रसिद्ध झाले.

# साहसी श्रीदत्त

खूप वर्षापूर्वी माळवा प्रांतात यज्ञसोम नावाचा एक विद्वान ब्राह्मण राहात होता. त्याला कालनेमि आणि विगतभय या नावाचे दोन मुलगे होते. लहानपणीच त्यांचे आईवडील देवाघरी गेल्यामुळे विद्या शिकण्याकरिता ते पाटलीपुत्र नावाच्या नगरास गेले. त्या नगरात देवशर्मा नावाचा एक विद्वान पंडित राहात होता. त्याच्या घरी जाऊन ह्या दोन भावांनी त्याला आपली हकीकत थोडक्यात सांगितली. तेव्हा त्या पोरक्या मुलांची विद्या शिकण्याची तळमळ पाहून देवशर्माने त्यांना आपल्या घरी ठेवून घेतले. वेदाबरोबर त्यांना अनेक विद्या शिकविल्या. कुशाग्र बुद्धीने ते दोन भाऊ लवकरच अनेक विद्यांमध्ये प्रवीण झाले. नंतर देवशर्माने आपल्या दोन मुली देऊन त्यांना आपले जावई करून घेतले.

कालनेमि आणि विगतभय पाटलीपुत्र नगरातच राहून सुखाने संसार करू लागले. आपल्या शेजारी राहणारे लोक श्रीमंत आहेत असे पाहून कालनेमीला त्यांचा हेवा वाटू लागला. आपणही त्यांच्यासारखे श्रीमंत व्हावे या महत्त्वाकांक्षेने त्याने उग्र तप करून लक्ष्मीला प्रसन्न करून घेतले. त्याच्यापुढे प्रगट झालेली लक्ष्मी त्याला म्हणाली, 'तुझ्या इच्छेप्रमाणे तुला खूप द्रव्य मिळेल. तुझा मुलगा राजा होईल. पण निर्मळ मनाने तू तप न केल्यामुळं तुझी गत अखेर मात्र चोरासारखी होईल.'

पुढे कालनेमीने व्यापार करण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसात तो खूप श्रीमंत झाला. त्याला एक मुलगाही झाला. श्रीच्या वरामुळे मुलगा झाला म्हणून त्याने मुलाचे नाव श्रीदत्त असे ठेवले. वाढत्या वयाबरोबर श्रीदत्ताने शस्त्रास्त्रांचे व कलांचे शिक्षण घेतले. अस्त्रे व बाहुयुद्धात तो प्रवीण झाला. याच सुमारास विगतभयाची पत्नी निधन पावली. तेव्हा विरक्त होऊन विगतभय तीर्थयात्रेला निघून गेला. त्या प्रांताचा राजा वल्लभशक्ती मोठा

गुणवान होता. त्याने गुणी श्रीदत्ताची आपल्या विक्रमशक्ती नावाच्या मुलाशी मैत्री घडवून आणली. विक्रमशक्ती गर्विष्ठ व मत्सरी होता. श्रीदत्ताच्या शौर्यावर खूष होऊन, बाहुशाली, वज्रमुष्ठी, महाबल, निष्ठुरक आदि क्षत्रिय वीरांनी श्रीदत्ताची मैत्री संपादन केली.

एकदा काय झाले, राजपुत्र विक्रमशक्ती व श्रीदत्त आपापल्या मित्रांबरोबर गंगा नदीकाठी खेळण्यासाठी गेले. तेथे राजाच्या खेळात विक्रमशक्तीच्या सेवकांनी त्याला आपला राजा केले. ते पाहून श्रीदत्ताच्या मित्रांनी श्रीदत्ताने आपला राजा केले. त्यामुळे आपला अपमान झाला असे विक्रमशक्तीला वाटले. तो श्रीदत्ताला वाटेल तसे टाकून बोलला. तेव्हा संतापलेल्या श्रीदत्तानै विक्रमशक्तीला बाहुयुद्धाचे आव्हान दिले. त्यात सुदैवाने श्रीदत्ताला साथ दिली. त्याने विक्रमशक्तीचा पराभव केला. तेव्हा सर्वांसमोर आपली फजिती झालेली पाहून विक्रमशक्तीने श्रीदत्त व त्याचे मित्र यांचा सूड घेण्याचा निश्चय केला. लुटपुटीच्या खेळातून विक्रमशक्तीशी आपले वैर निर्माण होईल अशी श्रीदत्ताची मुळीच कल्पना नव्हती.

आता विक्रमशक्तीबरोबर जाण्यात काही अर्थ नाही असा विचार करून श्रीदत्त आपल्या मित्राबरोबर गंगेच्या काठाने पुढे निघाला. तो काही पाऊले चालून गेला नाही तोच पूर आलेल्या गंगा नदीतून वाहात चाललेली एक सुंदर स्त्री त्याला दिसली. तेव्हा लगेच श्रीदत्ताने त्या स्त्रीला वाचविण्यासाठी नदीत उडी घेतली. मोठ्या झपाट्याने पाणी कापीत श्रीदत्त त्या बुडण्याच्या बेतात असलेल्या स्त्रीजवळ गेला आणि त्याने तिचे केस पकडले. पण ती स्त्री पाण्याबाहेर न येता खाली खालीच जाऊ लागली. अखेर तिच्यासह श्रीदत्ताने नदीचा तळ गाठला. आणि एक मोठा चमत्कार घडून आला.

आता श्रीदत्त जिथे उभा होता तिथे पाणी नव्हते. एका अनोळखी रम्य प्रदेशात आपण आलो आहोत असे त्याला आढळून आले. जवळच एक श्रीशंकराचे मंदिर त्याच्या दृष्टीस पडले. ज्या स्त्रीचे केस त्याने पकडले होते ती त्याच्या हातातून निसटून केव्हाच अदृश्य झालेली होती. घडलेल्या प्रकाराबद्दल स्वतःशी आश्चर्य करीत श्रीदत्ताने मंदिरात जाऊन श्रीशंकराचे दर्शन घेतले आणि मंदिराजवळ असलेल्या बागेतील एका झाडाखाली त्याने

विश्रांती घेत रात्र घालविली.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे श्रीशंकराची पूजा करण्याकरिता आलेली ती सुंदर स्त्री श्रीदत्ताला दिसली. पूजा करून ती निघाली तेव्हा श्रीदत्तही तिच्या पाठोपाठ चालला. थोड्याच वेळात ती स्त्री एका भव्य अशा घरात शिरली. श्रीदत्त तिच्या मागोमाग होताच. घरातील एका महालात शिरून ती तिथे असलेल्या एका पलंगावर बसली. आता तिच्या भोवती हजार स्त्रियांचा समुदाय श्रीदत्ताला दिसून आला. श्रीदत्त त्या स्त्रीला काही विचारणार तोच ती एकाएकी मोठ्यांदा रडू लागली. ते पाहून गोंधळलेल्या श्रीदत्ताने तिला विचारले "तुम्ही कोण ? काय आहे तुमचे दुःख ! ते मला सांगा. मी ते खचित दूर करण्याचा प्रयत्न करीन."

असे श्रीदत्ताचे धीराचे शब्द ऐकून त्या स्त्रीने मोठ्या कष्टाने आपली आसवे आवरली व ती म्हणाली, 'महाराज, आम्ही हजारजणी दैत्यराज बलीच्या नाती आहोत. मी सर्वात मोठी, माझे नाव विद्युतप्रभा. माझ्या भोवती असलेल्या या साऱ्या माझ्या बहिणी. आमच्या आजोबांना भगवान विष्णूने पाताळात घातले. आमच्या पित्याला मारून त्याने आम्हाला नगराबाहेर घालवून दिले. आम्हाला नगरात पुन्हा जाता येऊ नये म्हणून त्याने नगराच्या प्रवेशद्वारावर एक भयंकर सिंह ठेवला आहे. तो खरा नसून कुबेराच्या शापामुळे सिंह बनलेला एक यक्ष आहे. नगरात पुन्हा प्रवेश मिळावा म्हणून आम्ही विष्णूची प्रार्थना केली, तेव्हा तो म्हणाला, "जेव्हा एखाद्या साहसी माणसाच्या हातून या सिंहाचा नाश होईल तेव्हा तो यक्ष शापमुक्त होईल. आणि तुम्ही नगरात जाऊ शकाल. आपण शूर आहात असे आम्हाला कळले आहे. आपण त्या सिंहाला ठार मारा आणि आमच्यावर उपकार करा. तसे करण्याने आपल्याही पदरात फार मोठा लाभ पडणार आहे. शापमुक्त झालेला यक्ष आपणास मृगांक नावाची एक तलवार देईल. त्या तलवारीच्या प्रभावाने तुम्ही पृथ्वीपती व्हाल."

दुसऱ्या दिवशी श्रीदत्त सर्व दैत्यकन्यांबरोबर त्यांच्या नगराकडे निघाला. त्याला पाहताच नगराच्या प्रवेशद्वारावरील सिंहाने एक भयंकर गर्जना केली. तेव्हा सर्व दैत्यकन्या घाबरल्या, श्रीदत्त मात्र निर्भयपणे पुढे गेला. त्याने सिंहाबरोबर बाहुयुद्ध करून त्याचा नाश केला. तेव्हा शापमुक्त झालेल्या यक्षाने

श्रीदत्ताला कृतज्ञतेची खूण म्हणून आपली दिव्य अशी मृगांक नावाची तलवार बक्षिस दिली आणि तो गुप्त झाला. नंतर विद्युतप्रभा व तिच्या बहिणी यांच्यासह श्रीदत्त त्या नगरात गेला. विद्युतप्रभेने श्रीदत्ताला एक विषनाशक अंगठी आपल्यावर केलेल्या उपकाराबद्दल भेट म्हणून दिली. आणि ती म्हणाली, "महाराज, ही तलवार आणि अंगठी घेऊन या जवळच्या विहिरीत स्नान करा."

त्याप्रमाणे श्रीदत्ताने त्या विहिरीत बुडी मारली आणि पुन्हा वर येऊन पाहातो तो आपण पहिल्या ठिकाणी गंगेच्या प्रवाहातच आहोत असे त्याला आढळले. तेव्हा त्याला मोठे आश्चर्य वाटले आणि थोडेसे वाईटही वाटले. आपण ज्या घटना नुकत्याच अनुभवल्या ते स्वप्न तर नसेल ना, असा विचार त्याच्या मनात आला, पण त्याच क्षणी आपल्या हातातील तलवारीकडे आणि बोटातील रत्नजडित अंगठीकडे त्याचे लक्ष गेले. आणि जे घडले ते सारेच खरे होते अशी त्याची खात्री झाली. गोंधळलेल्या मनःस्थितीत श्रीदत्त नदीतून बाहेर पडला. आणि आपल्या मित्रांना भेटण्यासाठी निघाला. पण वाटेतच त्याला त्याचा निष्ठुरक नावाचा एक मित्र भेटला. त्याने श्रीदत्ताला एका बाजूला नेले आणि तो त्याला म्हणाला, "श्रीदत्ता, तू त्या दिवशी गंगेत उडी टाकलीस व पुन्हा वर आलाच नाही. आम्ही पुष्कळ दिवस शोध केला. तू जिवंत नाहीस असे वाटून आम्ही आत्महत्त्या करण्याचा विचार निश्चित केला. पण तितक्यात आकाशवाणी झाली, 'मुलांनो, असा विचार करू नका. श्रीदत्त जिवंत आहे. तो लवकरच तुम्हाला भेटेल.' त्याप्रमाणे ही बातमी आम्ही तुझ्या वडिलांना सांगण्यासाठी आम्ही तुझ्या घरी जायला निघालो तेव्हा वाटेत आम्हाला एक सज्जन नगरवासी भेटला. तो आम्हाला म्हणाला, 'बाबांनो, तुम्ही नगरात जाऊ नका. राज वल्लभशक्ती मृत्यू पावला आहे. आता त्याचा मुलगा विक्रमशक्ती गादीवर बसला आहे. दुसऱ्या दिवशी तो कालनेमीच्या घरी गेला, आणि श्रीदत्त कोठे आहे, म्हणून त्याला विचारू लागला. श्रीदत्त कोठे आहे हे माहीत नसल्यामुळे कालनेमीने मला माहीत नाही असे उत्तर दिले. पण ते त्या दुष्ट विक्रमशक्तीला खोटेच वाटले. आणि मुलाला दडवून ठेवल्याच्या आरोपाखाली त्या क्रूर राजाने कालनेमीला एखाद्या चोराप्रमाणे सुळावर चढविले. त्या दारुण

२९८०४ ३७१०
८११.८१


दुःखाघाताने त्याची पत्नीही मरण पावली. आता तो क्रूरकर्मा श्रीदत्त व त्याच्या मित्रांना शोधीत आहे. तेव्हा तुम्ही सर्वजण येथून दूर कोठेतरी निघून जा.'

अशी त्या सज्जनाने सांगितलेली भयंकर वार्ता ऐकून आमच्यावर आकाश कोसळल्यासारखे झाले. पण आम्ही शांतपणे विचार विनिमय केला. आपल्या मित्रांपैकी बाहुशाली वगैरे पाचजण उज्जयिनीला गेले आणि मी येथेच गुप्तपणे तुझी वाट पहात राहिलो आहे. सुदैवाने आज तू भेटलास. आता इथे राहण्यात आपल्या जिवास धोका आहे म्हणून आपण उज्जयिनीला जाऊ. व सर्वांच्या विचाराने विक्रमशक्तीचा नाश कसा करावयाचा ते ठरवू." निष्ठुरकाने सांगितलेला हा दुःखद वृत्तांत ऐकून श्रीदत्ताला अतिशय वाईट वाटले. त्याने त्या क्षणी विक्रमशक्तीचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. आणि तो निष्ठुरकाला बरोबर घेऊन उज्जयिनीकडे निघाला. गंगेत बुडाल्यानंतरची सर्व हकीकत वाटेत त्याने निष्ठुरकाला सांगितली. ती ऐकून आश्चर्याने थक्क झालेल्या निष्ठुरकाला श्रीदत्ताच्या साहसाचे मोठे कौतुक वाटले.

प्रवास करीत करीत श्रीदत्त निष्ठुरकासह उज्जयिनीस येऊन पोचला. त्यांना पाहून त्यांच्या मित्रांना खूप आनंद झाला. श्रीदत्त मित्रासह बाहुशालीच्या घरी राहू लागला. पुढे वसंतोत्सव आला. त्यात भाग घेण्यासाठी श्रीदत्त आपल्या मित्राबरोबर एका उद्यानाकडे निघाला. त्यावेळी श्रीबिंबिकी राजाची मृगांकवती नावाची कन्याही तेथे आली होती. राजकन्येच्या सौंदर्याने श्रीदत्त दिपून गेला. त्याच क्षणी "धावा हो धावा, घात झाला. राजकन्या मृगांकवतीला साप चावला" अशी ओरड झाली. तेव्हा श्रीदत्त आपल्या मित्रांसह त्वरेने तिकडे धावला. सापाच्या विषाने मृगांकवतीची काया काळी पडत चालली होती. श्रीदत्त चटकन् पुढे झाला. आणि काही मंत्र उच्चारून त्याने आपल्या बोटातील विषनाशक अंगठी मृगांकवतीच्या बोटात घातली. काही क्षणांनी मृगांकवती सावध होऊन उठून बसली. तेव्हा तिथे असलेल्या सर्व लोकांना फार आनंद झाला, सर्वांनी श्रीदत्ताला धन्यवाद दिले.

ही हकीकत राजा श्रीबिंबिकीला कळताच तो त्वरेने तेथे आला. पण राजा कृतज्ञतेपोटी आपल्याला काही द्रव्य देवू लागेल असे वाटून श्रीदत्त तेथून आपल्या मित्रासह, राजकन्येच्या बोटात घातलेली अंगठी परत न घेता

बाहुशालीच्या घराकडे निघून गेला. पुढे राजाने त्याच्याकडे सुवर्णालंकाराची भेट पाठवली. पण ती त्याने बाहुशालीच्या वडिलांना देऊन टाकली. पुढे काही दिवसांनी श्रीदत्ताच्या भाग्याने राजकन्या मृगांकवतीची प्रियसखी भावनिका अंगठी परत देण्याच्या मिषाने श्रीदत्ताकडे आली, व म्हणाली, ''महाराज, एकतर तुम्हाला वरावे नाहीतर मरण यावे असा माझ्या सखीने निश्चय केला आहे.'' असे भावनिकेचे बोलणे ऐकून श्रीदत्ताने भावनिकेसह आपल्या मित्रांचा सल्ला घेतला. अखेर गुप्तपणे मृगांकवतीला घेऊन मथुरेस जायचे व तेथे श्रीदत्ताने तिच्याशी गांधर्व विधीने विवाह करावयाचा, असे सर्वानुमते ठरले.

दुसऱ्या दिवशी बाहुशाली आपल्या तिघा मित्रांना बरोबर घेऊन व्यापाराच्या निमित्ताने मथुरेस जाण्यास निघाला. राजकन्येस लवकर प्रवास करता यावा म्हणून त्याने वाटेत चपल वाहनांची योजना केली. इकडे श्रीदत्ताने राजकन्येचा अंतःपुरात एक गरीब स्त्री व तिची मुलगी अशा दोघींना दारू पाजून निजविले. नंतर भावनिकेने रात्री दिवा लावण्याच्या निमित्ताने तो महाल पेटवून दिला. आणि मृगांकवतीसह ती तेथून बाहेर पडली. श्रीदत्ताने त्या दोघींना आपल्या दोन मित्रांबरोबर मथुरेकडे पाठविले. महालाला आग लागल्यानंतर मोठा गोंधळ उडाला. जेव्हा आग विझविण्यात आली, तेव्हा त्या आगीत दोन स्त्रियांचे दग्ध देह आढळून आले. त्यावरून राजकन्या मृगांकवती व तिची मैत्रीण त्या आगीत जळून भस्म झाल्या, अशी सर्वांची खात्री झाली. राजा व राणी यांना फार दुःख झाले.

या प्रसंगानंतर दुसरे दिवशी श्रीदत्त नेहमीप्रमाणे नगरात इकडे तिकडे फिरताना दिसला. त्यामुळे कोणालाही त्याच्याबद्दल संशय आला नाही. नंतर पूर्वी ठरल्याप्रमाणे तो आपल्या मित्रांना गाठण्यासाठी रात्री नगराबाहेर पडला. सतत दोन दिवस मजल मारल्यानंतर तिसऱ्या दिवशी सकाळी त्याने विंध्यारण्यात प्रवेश केला. थोड्याच वेळात त्याला वाटेवर भावनिका व आपले मित्र शस्त्रप्रहारांनी घायाळ होऊन पडलेले आढळले. त्यांची तशी अवस्था पाहून श्रीदत्त अगदी गोंधळून गेला. मृगांकवतीही त्याला कोठे दिसेना. तेव्हा श्रीदत्ताने दुःखाने व्याकुळ होऊन मित्रांना विचारले, ''असं कसं झालं ? तुमच्यावर कोणी हल्ला केला ? मृगांकवती कोठे आहे ?'' तेव्हा बाहुशाली म्हणाला, ''श्रीदत्ता,

पुष्कळ घोडेस्वारांनी आमच्यावर हल्ला केला, आम्हाला लुटले, त्यांचा प्रतिकार करताना आम्ही घायाळ झालो. त्या टोळीतील मुख्य घोडेस्वारानं राजकन्येला पळवून नेलं. ते घोडेस्वार फार दूर गेले नसावेत. आता आमची काळजी न करता तू पूर्वेच्या मार्गाने लवकर जा. आणि राजकन्येची सुटका कर."

बाहुशालीचे असे शब्द ऐकून श्रीदत्तला प्रथम काय करावे हे समजेना. आपल्या मित्रांना जखमी अवस्थेत टाकून जावे असे त्यास वाटेना व आपल्या प्रियेला चोरांच्या हाती राहू द्यावे हेही त्याला पटेना. अखेर मित्रांना धीर देऊन त्याने वेगाने चोरांचा पाठलाग सुरू केला. बरेच दूर गेल्यावर त्याला घोडेस्वारांची एक टोळी दिसली. त्या टोळीचा नायक एक तरुण क्षत्रिय होता व त्यानेच राजकन्येचे हरण केले होते. श्रीदत्त मुकाट्याने त्या टोळीत शिरला. त्याने टोळीच्या नायकाजवळ आपला घोडा नेला. टोळीचा नायक त्याच्याशी बोलू लागला असताच, श्रीदत्ताने त्याचा दंड पकडून त्याला खाली ओढले आणि जवळ असलेल्या एका शिळेवर आपटले. दुसऱ्याच क्षणी श्रीदत्त आपल्या शत्रूच्या चपळ घोड्यावर स्वार झाला. अंगावर धावून येणाऱ्या अनेक वारांस त्याने आपल्या मृगांक तलवारीने लोळविले. त्याचा पराक्रम पाहून उरले सुरले स्वार पळून गेले. नंतर आपले अलौकिक शौर्य पाहून थक्क झालेल्या मृगांकवतीला बरोबर घेऊन श्रीदत्ताने आपल्या मित्रांकडे जाण्यासाठी घोड्याला टाच मारली.

पण थोडेसे दूर जाताच लढाईत जखमी झालेला तो घोडा एकाएकी धाडकन् जमिनीवर कोसळला व मरण पावला. त्यावेळी सूर्य मावळतीकडे झुकला होता. प्रवासामुळे मृगांकवती थकून गेली होती, आणि तहानेने व्याकुळ झाली होती. जवळपास कोठे पाणी मिळेल का ते पाहण्यासाठी श्रीदत्ताने मृगांकवतीला एका झाडाखाली बसविले आणि तो पाण्याच्या शोधार्थ निघाला. त्याला पाणी मिळाले पण तोपर्यंत सूर्य मावळून अंधार पडला होता. अंधारात त्याला परत येण्याचा मार्ग सापडेना. दुर्दैवाने तो भलत्याच दिशेला गेला. इकडे मृगांकवती डोळ्यात पाणी आणून त्याची वाट पाहात होती. अंधार गडद होऊ लागला तेव्हा ती अतिशय भयभीत झाली आणि घाबरुन श्रीदत्ताला मोठ्यांदा हाका मारू लागली. तिकडे श्रीदत्तही मृगांकवतीला हाक घालीत होता. रात्र

संपून दिवस उजाडला. तेव्हा श्रीदत्त गेल्या संध्याकाळी मृगांकवतीला जिथे ठेवले होते तिथे आला. पण तेथे मरून पडलेला घोडाच त्याला दिसला. आणि मृगांकवती मात्र त्याला कोठेच आढळली नाही.

तेव्हा श्रीदत्त फार घाबरला. चटकन तो जवळच्या एका झाडावर चढला आणि इकडे तिकडे भटकत असलेली मृगांकवती कोठे दिसते का ते पाहू लागला. गोंधळलेल्या मनःस्थितीमुळे आपली मृगांक तलवार खाली ठेवून झाडावर चढून जाण्याचा अविचार त्याने केला होता. त्याच वेळी त्या वाटेने भिल्लांचा एक नायक तेथे आला व त्याने जमिनीवर पडलेली मृगांक तलवार उचलून घेतली. तेवढ्यात झाडावरून सरसर खाली उतरलेल्या श्रीदत्ताने त्या भिल्ल नायकाला आपल्या प्रियेविषयी विचारले, तेव्हा तो धूर्त भिल्ल नायक हसत म्हणाला, "तू माझ्या वस्तीकडे जा. ती तुला तेथे आढळेल. तुझी ही तलवार मी तुला नंतर देईन." असे म्हणून त्या भिल्ल नायकाने श्रीदत्ताला एका सेवकाबरोबर आपल्या वस्तीकडे पाठविले. त्या भिल्ल नायकाच्या घरी पोहोचल्यावर दमलेल्या श्रीदत्ताला झोप येऊ लागली. तेव्हा तेथील एक सेवक त्याला म्हणाला, "तुम्ही विश्रांती घ्या. बाईंना लवकरच पाठवतो." असे म्हणून तो निघून गेला. श्रीदत्त मृगांकवतीची वाट पाहाता पाहाता झोपी गेला. थोड्या वेळाने जेव्हा तो जागा झाला तेव्हा आपले दोन्ही पाय खोड्यात गुंतवले गेले आहेत असे त्यास आढळून आले.

आता आपण बंदिवान झालो, आपल्या हातून आपली सुटका होणे आणि मृगांकवतीचा शोध लागणे या दोन्ही गोष्टी कठीणच आहेत, असे श्रीदत्तास वाटले. व तो फार कष्टी झाला. यापुढे आपल्या दैवात काय काय घडणार आहे हे कळत नाही. सध्यातर स्वस्थ बसण्यावाचून दुसरा उपाय नाही. तरी सुद्धा आपल्याला भिल्लांनी कैद का करून ठेवले या प्रश्नाचे उत्तर त्याला विचार करूनही सापडेना. तितक्यात मोचनिका नावाची एक दासी श्रीदत्ताजवळ आली आणि त्याला म्हणाली, "हे वीरपुरुषा, आता कसला विचार करतोस ? आमचा राजा श्रीचंड परत आला म्हणजे तुला चंडिकादेवीपुढे बळी द्यावयाचे ठरले आहे. त्यासाठी तुला चांगले पदार्थ खाऊ घालून धष्टपुष्ट करावयाचे आहे. तू बळी जाणार म्हणून आमच्या राजकन्या सुंदरीला फार फार

वाईट वाटतंय. इकडे आणताना तिने तुला पाहिले तेव्हाच तिचं मन तुझ्यावर जडलंय. तिच्याशी लग्न करणं हा एकच तुझ्या सुटकेचा उपाय आहे. जर तू तसं केलं नाहीस तर तुला चंडिकेपुढे बळी जावं लागेल !''

भिल्ल राजाच्या कन्येशी लग्न करणे श्रीदत्ताला मुळीच पसंत नव्हते. त्याला वाटले, आपली सुटका झाली नाही तर आपल्याला विक्रमशक्तीवर सूड उगवणे शक्य होणार नाही. शिवाय मृगांकवतीची भेटही होणार नाही. अशा विचाराने मोचनिकेच्या म्हणण्याला त्याने सम्मती दिली. नंतर श्रीदत्ताने सुंदर व शालीन अश भिल्ल राजकन्येशी गांधर्व विवाह केला. सुंदरीच्या आईला तिची निवड पसंत होती. तिने सुंदरीच्या कल्याणाचा विचार केला. ती श्रीदत्ताकडे आली व म्हणाली, ''सुंदरीचे वडील फार रागीट आहेत. तू आता जावई झालास तरी ते तुझी मुक्तता करतील असं वाटत नाही. काही झालं तरी माझ्या मुलीच्या सुखासाठी मला तुझी सुटका केली पाहिजे. आणि ती देखील आत्ताच. लक्षात ठेव सुंदरीला मात्र तू कधीही विसरू नकोस !'' असे म्हणून तिने श्रीदत्ताची सुटका केली.

नंतर तेथून जाताना सुंदरीची भेट घेऊन तो तिला म्हणाला, ''सुंदरी, तुझ्यामुळेच आज माझी सुटका झाली. आता यापुढे लवकर तुझा सहवास लाभणार नाही म्हणून मला फार वाईट वाटतं. एक गोष्ट मात्र लक्षात ठेव. तुझ्या वडिलांनी माझी तलवार घेतली आहे. ते परत आल्यावर कोणत्याही उपायाने तू ती स्वतःच्या ताब्यात घे व जिवापलीकडे जपून ठेव. तुझा मी फार ऋणी आहे. देव करो नि आपली भेट लवकर होवो !'' अशा प्रकारे सुंदरीचा निरोप घेऊन श्रीदत्त भिल्लवस्तीतून बाहेर पडला. पुढे अरण्यातून वाटचाल करीत असताना मृगांकवती पुन्हा आपणास भेटेल अशी आशा त्याला वाटत होती. अखेर तिची व त्याची जिथे ताटातूट झाली होती, त्या ठिकाणी तो पुन्हा आला. तेवढ्यात समोरून येत असलेल्या एका पारध्यास त्याने पाहिले. व मृगांकवतीविषयी त्याला विचारले. तेव्हा तो पारधी म्हणाला, ''तुमचं नाव श्रीदत्त आहे का ?'' ''होय. मीच श्रीदत्त !'' श्रीदत्त म्हणाला. ''ठीक आहे. आता तुम्हाला घडलेली सर्व हकीकत सांगण्यास हरकत नाही. तुमची मृगांकवती मोठ्या दुःखानं आक्रोश करीत या अरण्यात इकडं तिकडं भटकत

होती. तिची ती दीन अवस्था पाहून मला फार वाईट वाटलं. मला तिची दया आली. मी तिला धीर देऊन आपल्या घरी घेऊन गेलो. पुढे मी तिच्यासह मथुरेजवळच्या नागस्थल गावात गेलो. तेथील विश्वदत्त नावाच्या वृद्ध ब्राह्मणाला ही माझीच मुलगी आहे असे सांगून तिला त्याच्या घरी ठेवलं, आणि तुझ्या शोधार्थ मी पुन्हा येथे आलो आहे. तू भेटलास फार चांगलं झालं. जिच्या तोंडून मी तुझं नाव ऐकलं तिला भेटण्यास तू आता ताबडतोब नागस्थलास जा!''

असे त्या पारध्याचे बोलणे ऐकून श्रीदत्ताला फार आनंद झाला. पारध्याचे आभार मानून श्रीदत्त लगेच नागस्थलाकडे निघाला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नागस्थली पोचल्यावर तो विश्वदत्ताच्या घरी गेला. विश्वदत्ताने त्याचे स्वागत केले. श्रीदत्ताने त्याला मृगांकवती विषयी विचारले तेव्हा विश्वदत्त त्याला म्हणाला, ''बाबारे, पारध्यानं मृगांकवतीला माझ्याकडं आणून ठेवलं हे खरं; पण सुरक्षिततेच्या दृष्टीनं मी तिला मथुरेतील माझ्या विगतभय नावाच्या एका मित्राच्या घरी ठेवून आलो आहे. विगतभय मथुरेचा राज्यमंत्री आहे. त्याला मूलबाळ नसल्याने तो स्वतःच्या मुलीप्रमाणे मृगांकवतीची काळजी घेत आहे. तेव्हा तू तिची काही एक चिंता करू नकोस. आजची रात्र तू माझ्या घरी मुक्काम कर व उद्या सकाळी मथुरेला जा.'' मोठ्या आशेने मृगांकवतीला भेटण्यासाठी आलेल्या श्रीदत्ताच्या पदरी पुन्हा निराशाच पडली. भल्या पहाटे तो उठला आणि दिवसाचा पहिला प्रहर संपण्यापूर्वी त्याने मथुरा गाठली.

नगराबाहेरच श्रीदत्ताला एक मोठी विहीर दिसली. विहिरीतले पाणी निर्मळ होते. दीर्घ प्रवासामुळे अंग व कपडे मलीन झालेले असल्यामुळे श्रीदत्ताने स्नान करण्याचा विचार केला. त्याप्रमाणे कपडे विहिरीच्या काठावर ठेऊन तो विहिरीत उतरला. पाण्यात बुडी मारताच त्याच्या हाताला एक वस्त्र लागले. स्नान झाल्यावर ते वस्त्र घेऊन तो वर आला. ते वस्त्र जड का लागते म्हणून तो पाहू लागला. तेव्हा त्याला त्या वस्त्राच्या एका कोपऱ्याला एक रत्नहार बांधलेला दिसून आला. मृगांकवती संबंधाने त्याच्या मनात विचार असल्यामुळे त्याने ते वस्त्र आपल्याबरोबर घेतले, आणि कपडे करून नगरात प्रवेश केला. काही अंतर श्रीदत्त चालून गेला नाही तोच त्याच्याजवळचे वस्त्र पाहून एका

नगररक्षकाने त्याला पकडले. त्याने ते वस्त्र उलगडून पाहताच त्यात त्याला चोरीला गेलेला रत्नहार आढळून आला. तेव्हा नगररक्षकाने श्रीदत्ताच्या मुसक्या बांधल्या आणि चोर म्हणून त्याला राजापुढे उभे केले. श्रीदत्ताने राजाला आपल्यासंबंधी सगळी खरी हकीकत सांगितली पण तिच्यावर राजाचा विश्वास बसला नाही. त्याने श्रीदत्ताला मृत्यूची शिक्षा दिली.

शिक्षेची अम्मलबजावणी करण्याकरिता राजसेवक ढोल वाजवीत आणि दवंडी पिटीत श्रीदत्ताला वधस्तंभाकडे घेऊन निघाले. ढोलाचा आवाज ऐकून राजमंत्र्याच्या घरात असलेली मृगांकवती सत्वर बाहेर आली. तिने श्रीदत्ताला चटकन् ओळखले. ती धावतच आत गेली आणि राजमंत्र्याला म्हणाली, "महाराज, राजसेवक ज्याला स्तंभाकडे नेत आहेत, ते खरोखरच माझे पती आहेत. कृपा करून त्यांना वाचवा. ते सज्जन आहेत. त्यांच्या हातून कुठलाही अविचार घडायचा नाही. आपण त्यांच्यावरील आरोपाची चौकशी करा." असे मृगांकवतीचे बोलणे ऐकून राजमंत्री धावत पळत राजाकडे गेला आणि त्याला सर्व हकीकत सांगितली. अखेर श्रीदत्ताची सुटका करून राजमंत्री त्याला आपल्या घरी घेऊन आला. प्रथम त्याने श्रीदत्त व मृगांकवतीची भेट घटवून आणली. अनेक संकटे व हालअपेष्टा यातून पार पडल्यानंतर त्या दोघांची भेट झाल्याने त्यांना किती आनंद झाला असेल हे सांगावयास नकोच. नंतर राजमंत्र्याने श्रीदत्ताची बालपणापासूनची सर्व हकीकत ऐकली तेव्हा त्याला खूप आश्चर्य वाटले. तो श्रीदत्ताला म्हणाला, "मुला, अगदी अकल्पित रीतीने तुझी अशी भेट होईल असे माझ्या स्वप्नातही आले नसते. तुझे वडील माझे सख्खे भाऊ. माझे नाव विगतभय. तू लहान होतास तेव्हा मी घर सोडले. आणि अनेक देश फिरून नंतर तपश्चर्या केली. तेव्हा एक यक्षीण माझ्यावर प्रसन्न झाली व तिने मला पाच हजार घोडेस्वार आणि सात कोटी सुवर्णमुद्रा दिल्या. आणि अखेर मी मथुरेच्या राजाचा प्रधान झालो. मला मुलगा नाही तेव्हा हे सर्व वैभव आता तुझेच आहे. तू इथेच माझ्याजवळ अगदी सुखात रहा."

नंतर विगतभयाने एका शुभ मुहूर्तावर श्रीदत्ताचा मृगांकवतीशी विधिपूर्वक विवाह साजरा केला. विक्रमशक्तीवर सूड उगविण्यासाठी

विगतभयाने योग्य वेळी त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले. बाहुशाली वगैरे मित्र न भेटल्यामुळे मात्र श्रीदत्ताला त्यांची काळजी वाटत होती. एके दिवशी विगतभय श्रीदत्ताला म्हणाला, ''श्रीदत्ता, तुझी इच्छा पूर्ण होण्याची वेळ आलेली दिसते. येथील शूरसेन राजाला एक मुलगी आहे. तिचे लग्न ठरविण्याकरिता तिला घेऊन अवंती देशास जाण्याची राजाने मला आज्ञा केली आहे. माझ्या मनात असा विचार आहे की, ती राजकन्या आणि तिच्याबरोबरचे सैन्य तुझ्या स्वाधीन करायचं. माझं सर्व सैन्य मी बरोबर घेतो. आपण मालव प्रांतात जाऊ आणि विक्रमशक्तीला शासन करू. नंतर शूरसेनाच्या मुलीशी तू विवाह कर.''

श्रीदत्ताला आपल्या चुलत्याचा हा विचार आवडला. त्याप्रमाणे श्रीदत्त आणि त्याचा चुलता सर्व सैन्य घेऊन, मृगांकवती व शूरसेनाच्या मुलीसह प्रवासास निघाले. वाटेत त्याला विंध्यारण्य लागले. त्या विंध्यारण्यात एकाएकी भिल्लांच्या अफाट सैन्यानी त्यांच्यावर हल्ला केला. श्रीदत्ताने व त्याच्या चुलत्याने मोठा पराक्रम केला. अखेर श्रीदत्त त्या लढाईत मूर्च्छित होऊन पडला. त्याच्या चुलत्याला भिल्लांनी कैद केले. श्रीदत्ताच्या सर्व सैन्याची केव्हाच पांगापांग झाली होती. लुटीत मिळालेले सर्व धन भिल्लांनी गोळा केले आणि मूर्च्छित असलेल्या श्रीदत्ताला त्यांनी चंडिकेच्या देवळात नेले. तेव्हा देवीच्या देवळात असलेली भलीमोठी घंटा, घण्..घण्...घण्.. अशी मोठ्यांदा वाजू लागली. त्या घंटेचा आवाज ऐकून भिल्लनायकाची मुलगी सुंदरी देवीच्या दर्शनासाठी तेथे गेली. श्रीदत्ताला पाहताच, तोच आपला पती आहे हे तिने ओळखले. आणि तिने आपल्या सेवकाकडून त्याची ताबडतोब सुटका केली.

श्रीदत्त शुद्धीवर आल्यावर त्यालाही आपल्या पत्नीची ओळख पटली. सुंदरीचे वडील केव्हाच मरण पावले होते. त्यांना मुलगा नसल्याने सुंदरीच भिल्लांच्या राज्याची राणी झाली होती. आता सुंदरीचा पती श्रीदत्त त्या राज्याचा राजा झाला. प्रथम श्रीदत्ताने बारा वाटा पळून गेलेले आपले सैन्य एकत्रित केले. मग त्याने आपले सासरे श्रीबिंबिकी आणि शूरसेन यांच्याकडे आपले खास दूत पाठविले. तेव्हा ते दोघेही आपल्या सैन्यासह येऊन श्रीदत्ताला भेटले.

त्याच वेळी श्रीदत्ताचे बाहुशाली वगैरे मित्र त्याला शोधत तिथे आले. नंतर श्रीदत्त अपल्या अफाट सैन्यासह मालव प्रांतावर चालून गेला. श्रीदत्ताजवळ एवढी अफाट सेना असेल असे विक्रमशक्तीला मुळीच वाटले

नव्हते. शिवाय त्याची युद्धाची तयारीही समाधानकारक नव्हती. त्यामुळे श्रीदत्ताच्या अफाट सैन्यापुढे विक्रमशक्तीच्या सैन्याने हार खाल्ली आणि श्रीदत्तापुढे शरणागती पत्करली. तेव्हा भीतीने गारठलेला विक्रमशक्ती रणांगणातून आपला जीव वाचविण्यासाठी पळून जाऊ लागला. श्रीदत्ताने त्याचा पाठलाग केला. थोड्याच वेळात त्याने विक्रमशक्तीला गाठले, आणि आपल्या वडिलांच्या वधाची त्याला आठवण करून दिली. नंतर आपल्या हातातील मृगांक तलवारीच्या एकाच प्रहाराने श्रीदत्ताने विक्रमशक्तीचे मस्तक धडापासून वेगळे केले. अशा रीतीने श्रीदत्ताने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

आता श्रीदत्त पाटलीपुत्राचा राजा झाला. व आपल्या तिन्ही राण्यांसह सुखाने राज्य करू लागला.

# महाकविराज गुणाढ्य

प्रतिष्ठान (पैठाण) नगरात सोमशर्मा नावाचा एक ब्राह्मण राहत होता. त्याला वत्स आणि गुल्मक हे दोन मुलगे व श्रुतार्था नावाची एक मुलगी होती. दुर्दैवाने त्या मुलांच्या लहानपणीच त्यांचे आई वडील त्यांना सोडून गेले. श्रुतार्था मोठी झाल्यावर नागराज वासुकीचा पुतण्या कीर्तिसेन याच्याशी श्रुतार्थाचे लग्न झाले. काही दिवसांनी तिला एक मुलगा झाला. त्याचा जन्म झाला तेव्हा तो गुणांचा अवतार आहे अशी देववाणी झाली. म्हणून त्याचे नाव गुणाढ्य असे ठेवण्यात आले. गुणाढ्याच्या बाललीलांनी श्रुतार्था व त्याचे दोन्ही मामा यांना खूप आनंद होत असे.पुढे श्रुतार्था मरण पावली. गुणाढ्याच्या मायेचे छत्र नाहीसे झाले. पुढे गुणाढ्याच्या मामांनी त्याचे लालनपालन केलेन. पण त्याच्या नशीबी तेही सुख नव्हते. क्रूर काळाने त्याच्या दोन्ही मामांना आपल्या ताब्यात घेतले. अखेर गुणाढ्य अनाथ व पोरका झाला.

गुणाढ्याला लहानपणापासून विद्येची आवड होती. त्याने ईश्वरावर विश्वास ठेवला, आणि घराचा त्याग करून तो विद्या शिकण्याकरिता दक्षिणेत गेला. तिथे एका विद्वान गुरूजवळ त्याने विद्याभ्यास केला. लवकरच तो नाना प्रकारच्या शास्त्रात प्रवीण झाला. एक विद्वान पंडित म्हणून त्याला प्रसिद्धी मिळाली. त्याला मोठा शिष्यवर्गही लाभला. पुढे त्याला आपल्या घरी परत जावे असे वाटू लागले. म्हणून तो आपल्या काही शिष्यांना बरोबर घेऊन पुन्हा प्रतिष्ठान नगरास परत आला. आता त्या नगराचे स्वरूप पार बदलले होते. सातवाहन हा त्या नगराचा राजा झाला होता. गुणाढ्य आपल्या शिष्यांसह राजवाड्यात गेला. त्याची कीर्ती राजाच्या कानी गेलेली होती. राजाने गुणाढ्याचा मोटा सत्कार केला व त्याला आसनस्थ होण्याची विनंती केली. राजाचा प्रधान शिववर्मा याने, "हे सर्व विद्यापारंगत असे गुणाढ्य नावाचे महान पंडित आहेत", अशी गुणाढ्याची राजाला ओळख करून दिली. गुणाढ्याच्या विद्वत्तेवर प्रसन्न होऊन सातवाहन राजाने त्याला मंत्रीपद दिले. अशा रीतीने आपला भाग्योदय होईल अशी गुणाढ्याला मुळीच कल्पना नव्हती.

नंतर त्याने एका कुलशीलवान मुलीशी विवाह केला. राजसेवा करीत असताना अध्यापनाचे आपले व्रत मात्र त्याने सोडले नाही.

एकदा वसंत ऋतूत जलक्रीडा करण्यासाठी राजा आपल्या परिवारासह देवीकृती नावाच्या उद्यानात गेला. तेथे एक मोठा निर्मळ पाण्याचा तलाव होता. त्या तलावात राजा आपल्या परिवारासह जलक्रीडा करू लागला. क्रीडा करताना राजा आपल्या एका राणीवर पाण्याचा मारा करू लागला. तेव्हा ती राजाला म्हणाली, ''मोदकैः परिताड्य माम् !'' या तिच्या म्हणण्याचा अर्थ राजाला कळला नाही. कारण तो निर्बुद्ध होता. त्याला वाटले, जलक्रीडेने राणी दमून दिला फार भूक लागली असावी. म्हणून ती मोदक मागत आहे. त्याने मोदक आणण्याची आज्ञा आपल्या सेवकाला दिली. मोदकाने भरलेले ताट आणताच राजा मोदकांचा राणीवर वर्षाव करू लागला. तेव्हा आश्चर्यचकित झालेले सर्वजण राजाकडे बघतच राहिले. राणी हसून राजाला म्हणाली, ''महाराज, मोदकांची येथे काय जरूरी आहे ? 'मा उदकैः परिताड्य माम्' म्हणजे माझ्यावर पाण्याचा मारा करू नका. मा उदकैः या दोन शब्दांचा साधा संधीही तुम्हाला कळला नाही ? इतके कसे हो तुम्ही मूर्ख !'' असे राणीचे शब्द ऐकून तेथे असलेले सर्वजण हसू लागले. तेव्हा राजा फार खजील झाला. जलक्रीडा थांबवून तो खिन्न होऊन आपल्या महालात परत गेला.

नंतर अपमानित झालेल्या राजाने भोजन सोडले. आणि मौनव्रत धारण करून तो बसला. राजाची मन :स्थिती बरी नाही ही बातमी सगळीकडे पसरताच लोकांची राजवाड्याकडे रीघ लागली. पण कोणालाही राजाला भेटण्यास परवानगी मिळाली नाही. राजाला विद्यावंत व्हायचे होते. आणि तसे घडल्याखेरीज पूर्वीप्रमाणे आपण आपली दिनचर्या सुरू करायची नाही असा त्याने निश्चय केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रधान शिववर्मा आणि गुणाढ्य राजाच्या भेटीस गेले. त्यांच्याशीही राजा बोलला नाही. गुणाढ्याने विचारले, ''महाराज, आपण असे उद्विग्न का ?'' राजाने गुणाढ्याकडे वळून पाहिले नाही किंवा त्याच्या प्रश्नाला उत्तरही दिले नाही. तो महालातील छताकडे शून्य दृष्टीने बघत पडून राहिला होता. तेव्हा राजाला बोलके करण्यासाठी शिवशर्म्याने एक युक्ती योजिली. तो राजाला म्हणाला, ''महाराज, आज पहाटे मला एक अद्‌भुत स्वप्न पडले. स्वप्नात आकाशातून एक कमळ खाली पडले. त्याच वेळी आकाशातून खाली उतरलेल्या एका दिव्य कुमाराने ते कमळ

फुलविले. तेव्हा त्यातून पांढरे शुभ्र वस्त्र नेसलेली एक दिव्य स्त्री निघाली. आणि आपल्या मुखात शिरली. इतक्यात मी जागा झालो. महाराज, माझी खात्री आहे की ती दिव्य स्त्री म्हणजे साक्षात् सरस्वतीच आहे. आता तुम्ही विद्यावंत होणारच !''

असे शिववर्म्याचे बोलणे ऐकताच सातवाहन राजाने मौन सोडले. त्याने गुणाढ्याला विचारले, ''पंडितराज, व्याकरणशास्त्र शिकायला किती वर्ष लागतील ?'' ''महाराज'', गुणाढ्य म्हणाला, '' ते शिकण्यास सामान्य लोकांना बारा वर्षं लागतात. मी ते आपणास सहा वर्षांत शिकवीन.'' तेव्हा गुणाढ्याबद्दल मत्सरग्रस्त झालेला शिववर्मा राजाला म्हणाला, '' महाराज, मी आपणास सहा महिन्यात सर्व व्याकरण शिकवीन ! '' ''ते मुळीच शक्य नाही !'' गुणाढ्य आपला आवाज थोडा चढवून शिववर्म्याला म्हणाला, ''जर तू महाराजांना सहा महिन्यात व्याकरण शिकवलेस तर मी संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही भाषा सोडून देईन !''

असे गुणाढ्याचे बोलणे ऐकून इरेला पेटलेला शिववर्मा गुणाढ्याला म्हणाला, ''जर मी महाराजांना सहा महिन्यात व्याकरण शास्त्र शिकवले नाही तर मी बारा वर्ष तुमच्या पादुका डोक्यावर घेऊन वाहून नेईन !'' या प्रमाणे गुणाढ्य व शिववर्मा यांची पैज लागली. आता आपण विद्यावंत होणार म्हणून राजाला खूप आनंद झाला. घरी गेल्यावर आपण पैजेत यशस्वी होणे कठीण आहे असे शिववर्म्याला वाटू लागले. तेव्हा त्याने घडलेली सर्व हकीकत आपल्या पत्नीला सांगितली. तेव्हा ती कष्टी होऊन म्हणाली, '' तुमची प्रतिज्ञा पूर्ण होणं फारच कठीण आहे. तेव्हा तुम्ही कार्तिक स्वामीची आराधना करा. तो तुम्हाला मार्गदर्शन करील.''

शिववर्म्याला आपल्या पत्नीचा सल्ला पटला. कार्तिक स्वामींच्या दर्शनासाठी तो भल्या पहाटे अरण्याकडे निघाला. कार्तिक स्वामींची कृपा होईपर्यंत त्याने जेवणखाण सोडून दिले. आणि मौनव्रत धारण केले. बराच मोठा प्रयास करून त्याने कार्तिक स्वामींच्या मंदिरात प्रवेश केला. तिथे त्याने प्रखर तप करून कार्तिक स्वामींना प्रसन्न करून घेतले. त्यांच्याकडून इच्छित वर प्राप्त करून घेतला. आणि तो नगरास परतला. शिववर्म्याला पाहून राजाला फार आनंद झाला. शिववर्म्याने स्मरण करताच पुढे प्रगट होणाऱ्या सर्व विद्या राजाला अर्पण केल्या. त्याबरोबर सातवाहन राजा विद्यावंत झाला दैवी सिद्धी

मिळाल्यावर काय मिळणार नाही? राजा विद्यावंत झाला. म्हणून सव' नागरिकांना आनंद झाला. त्यांनी फार मोठा उत्सव थाटामाटाने नगरात साजरा केला. राजाने गुरुदक्षिणा म्हणून अनेक नानाविध रत्ने शिववर्म्याला दिली. व नर्मदेच्या तीरावरील भरूकच्छ (भडोच) नावाचा देश त्याला बक्षीस दिला.

पैजेत हरल्यामुळे गुणाढ्याने संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही भाषा सोडून दिल्या आणि मौन धारण करूनच त्याने राजाचा निरोप घेतला. गुणाढ्याने नगर सोडून जाऊ नये म्हणून राजाने खूप प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बिचारा गुणाढ्य, संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही भाषांच्या त्यागामुळे तोंड असून मुका बनला होता. त्याला वाटले आता विंध्यवासिनीचे दर्शन घ्यावे. म्हणून तो विंध्यारण्यात गेला. तिथे देवीने त्याच्या स्वप्नात येऊन त्याला सांगितले, "तू काणभूतीची भेट घे!" "कोण आहे काणभूती?" गुणाढ्याने विचारले. "काणभूती पिशाच्चांचा प्रमुख आहे. तो तुला तुझ्या चिंतेतून मुक्त करील." पुढे देवीच्या आज्ञेप्रमाणे गुणाढ्य काणभूताची भेट घेण्यास निघाला. रात्रीच्या वेळी त्याला पिशाच्चांचा एक मेळावा दिसला. त्यातील पिशाच्चे पैशाची भाषेत आपापसात बोलत होती. गुणाढ्य अतिशय धार्मिक व पवित्र होता. त्याला वाटले, आपण तिन्ही भाषांचा त्याग केला. आता कोणत्या भाषेत बोलायचे, तेव्हा या पिशाच्चांच्या मेळाव्यात जाऊन त्यांच्या सहवासात आपण काही दिवस राहिलो तर त्यांची पैशाची भाषा आपणास शिकता येईल. अला विचार करून गुणाढ्य पुढे गेला.

गुणाढ्याला पाहून त्या मेळाव्यात एकच गोंधळ उडाला. सर्व पिशाच्चे आरडाओरड करू लागली. गुणाढ्य न घाबरता त्यांचे जवळ गेला. तेव्हा पिशाच्चांच्या मुख्याने आपल्या सोबत्यांना शांत केले. आणि गुणाढ्याचे स्वागत करण्यासाठी तो पुढे झाला. तोच काणभूती आहे हे गुणाढ्याने ओळखले. पिशाच्चांच्या सहवासात कही दिवस राहिल्यावर गुणाढ्य पैशाची भाषेत प्रवीण झाला. तेव्हा पुष्पदंत नावांच्या शिवगणाने सांगितलेल्या सात विद्याथरांच्या अद्‌भुतरम्य कथा काणभूतीने गुणाढ्यास सांगितल्या. त्या कथा पैशाची भाषेत होत्या. त्या एवढ्या अद्‌भुत व रसाळ होत्या की त्या गुणाढ्याच्या मनात घर करून राहिल्या. त्या सुरम्य कथा चिरंजीव कराव्यात असे त्याने निश्चित केले.

नंतर गुणाढ्याने अरण्यातील एक एकांत जागा पाहिली. आणि तेथे बसून कथालेखन करायचे असे ठरविले. पण त्या अरण्यात लेखन साहित्य

कोठून आणायचे ही अडचण चतुर गुणाढ्याने स्वत :च दूर केली. काही पिशाच्चांच्या साहाय्याने त्याने भूर्जपत्रे तयार करून घेतली. त्या भूर्जपत्रावर गुणाढ्याने स्वत :च्या शरीरातील रक्त काढून दररोज काही श्लोक लिहिण्याचा उपक्रम चालू केला. त्याने सात वर्षात सात लक्ष श्लोक रचून सात विद्याधरांच्या कथा बांधून टाकल्या. अशा रीतीने त्याने सात विद्याधरांच्या कथांवर महाकाव्य रचले. तेच बृहत्कथा या नावाने प्रसिद्ध पावले. विद्याधर कदाचित त्या कथा आपल्यापासून हिरावून नेतील या भीतीने गुणाढ्य अतिशय काळजीपूर्वक त्यांचे जतन करू लागला.

बृहत्कथा ग्रंथ पूर्ण झाल्यावर गुणाढ्याने तो काणभूतीस वाचून दाखवला. तेव्हा काणभूती शापमुक्त झाला व पूर्वीप्रमाणे यक्ष बनला. त्याचप्रमाणे ती पवित्र कथा ऐकून इतर पिशाच्चेही स्वर्गास गेली. एवढा त्या दिव्य ग्रंथाचा प्रभाव होता. आता या कथांचा जगात प्रसार करून त्या लोकप्रिय कशा करायच्या असा गुणाढ्यास प्रश्न पडला. तेव्हा त्याचे गुणदेव आणि नंदिदेव या नावाचे शिष्य त्याला म्हणाले, "गुरुवर्य, आपण हे महाकाव्य सातवान राजास अर्पण करावे. तो विद्यावंत आहे, आणि विद्वानांना आश्रय देणारा आहे शिवाय तो कवीही आहे. तो आपल्या काव्याचा खात्रीने आदर करील. आणि त्याच्याकडून आपले कार्य लोकप्रिय होण्याची व्यवस्था होईल."

गुणाढ्य स्वत : होऊन सातवाहन राजाकडे जाण्यास तयार नव्हता पण त्याच्या शिष्यांनी बृहत्कथा घेऊन राजाकडे जाण्याची परवानगी मागताच त्याने दिली. स्वत : गुणाढ्यही त्यांच्या बरोबर प्रतिष्ठान नगरात गेला. तेथे तो देवीकृत उद्यानात राहिला. त्याचे दोघे शिष्य बृहत्कथेचे भलेमोठे गठ्ठे घेऊन सातवान राजाकडे गेले व राजाला वंदन करून म्हणाले, "महाराज, आमचे गरुवर्य गुणाढ्य कवींनी रचलेले बृहत्कथा नावाचे हे एक महाकाव्य आहे. आपण त्याचा स्वीकार करावा." तेव्हा विद्येने गर्विष्ठ झालेला राजा त्यांना म्हणाला, "हे बृहत्कथा महाकाव्य सात लक्ष श्लोकांचे आहे खरे, पण ते पैशाची भाषेत लिहिलेले आहे. ती भाषा मुळीच रसाळ नाही. शिवाय हे काव्य रक्ताने लिहिले आहे. म्हणून मी त्याचा स्वीकार करीत नाही!"

असे राजाचे शब्द ऐकून गुणाढ्याच्या शिष्यांना राजाचा खूप राग आला. पण राजापुढे त्यांचे काय चालणार! त्यांनी मुकाट्याने बृहत्कथेचे गठ्ठे उचलले आणि ते गुणाढ्याकडे परत निघाले. गुणाढ्य त्यांची वाट पाहातच

होता. आपल्या शिष्यांनी बृहत्कथा परत आणलेली पाहून आणि त्यांनी सांगितलेली हकीकत ऐकून गुणाढ्याला अतिशय वाईट वाटले. बराच वेळ शांत बसून राहिल्यावर त्याने आपल्या मनाशी काहीतरी निश्चय केला. आणि बृहत्कथा घेऊन तो आपल्या शिष्यांसह त्या उद्यानातून बाहेर पडला. नंतर त्याने प्रतिष्ठानापासून जवळ असलेल्या एका डोंगरावरील अरण्याची वाट धरली. संध्याकाळच्या सुमारास गुणाढ्य आपल्या शिष्यांसह त्या अरण्यात पोचला. तेथे निवांत असे ठिकाण पाहून त्याने एका झाडाखाली मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी गुणाढ्य लवकर उठला. जवळच असलेल्य झऱ्यावर जाऊन त्याने आपले आन्हिक उरकले. नंतर त्याने शांतपणे जवळपास पडलेला पालापाचोळा गोळा केला. व अग्नि पेटवून त्याने एक अग्निकुंड तयार केले. नंतर बृहत्कथेची पोथीसमोर ठेवून तो त्या अग्निकुंडासमोर बसला आणि मनातील दुःखाचे कढ दाबून टाकीत धीरगंभीर आवाजात त्याने आपल्या आवडत्या बृहत्कथेचे अखेरचे वाचन सुरू केले. त्याच्या गोड व गंभीर स्वरांनी अरण्य निनादू लागले. त्या स्वरांनी पक्ष्यांना आकर्षित केले. ते भराऱ्या मारीत तिथे आले. त्याचप्रमाणे अरण्यातील पशूही मंत्रमुग्ध होऊन गुणाढ्याच्या भोवती जमू लागले.



गुणाढ्य कथागायनात एवढा तल्लीन होऊन गेला होती की, त्याचे कोणीकडेही लक्ष गेले नाही. पशूपक्षी आणि जवळपासची माणसेही जागीच खिळल्यासारखी होऊन एकचित्ताने ती कथा ऐकत होती. कथेचे एकेक पान वाचावे व 'अग्नये स्वाहा' असे म्हणून ते अग्निदेवतेला अर्पण करावे असा क्रम गुणाढ्याने चालू ठेवला होता. ती दिव्य कथा ऐकण्यासाठी नगरातील लोकांचा लोंढा जादूने भारल्याप्रमाणे स्वरांच्या अनुरोधाने तिथे येऊ लागला होता. सर्वजण आपली तहानभूक हरवून तीं कथा ऐकत बसले होते. अन्नपाणी नसल्यामुळे सर्वांची शरीरे शुष्क झाली होती. सातवाहन राजाला मात्र त्याबाबत काहीच कळले नव्हते.

इकडे हा प्रकार चालला असता, तिकडे सातवाहन राजाला बरे वाटेनासे झाले. तेव्हा राजवैद्याने त्याच्या आजाराचे निदान करून सांगितले, "महाराज, शुष्क मांस खाल्यामुळे आपली प्रकृती बिघडली आहे." तेव्हा राजाने स्वयंपाक्याला शुष्क मास भोजन देण्याचे कारण विचारले. तेव्हा तो नम्रपणे म्हणाला, "महाराज, त्यात माझा काही गुन्हा नाही. मांस आणण्याकरिता नेमलेले पारधी मला सध्या सुकलेले मांसच आणून देतात." तेव्हा राजाने पारध्यांस बोलावले आणि शुष्क मांसच आणून देण्याचे कारण विचारले. तेव्हा पारधी म्हणाले, "महाराज, नगराजवळच्या डोंगरावर एक ब्राह्मण अग्निकुंड पेटवून बसला आहे. तो आपल्या समोरील एका ग्रंथाचे एक एक पान वाचून ते तो अग्निकुंडात टाकीत आहे! त्या ब्राह्मणाचे वाचन ऐकण्याकरिता अरण्यातील सर्व पशूपक्षी आपले खाणेपिणे सोडून त्याच्याभोवती बसून राहिले आहेत. त्यामुळे पशुपक्ष्यांचे मांस शुष्क झाले असावे!"

असे पारध्यांचे बोलणे ऐकून सातवाहन राजाला फार आश्चर्य वाटले. मग स्वत:ची खात्री करून घेण्यासाठी राजा पारध्यांना बरोबर घेऊन त्या डोंगरावर गेला. तिथे राजाला जे दृश्य दिसले ते खरोखरच अलौकिक होते. एका अग्निकुंडासमोर जटाधारी व तेजस्वी गुणाढ्य बसला आहे. तो आपल्या हातातील पानावरचे श्लोक मधुर व गंभीर स्वरात म्हणत आहे, त्याच्या डोळयातून अश्रू गळत आहेत. त्याच्याभोवती त्याचे काव्य ऐकण्यासाठी. जमलेले पशूपक्षी व माणसे भारल्याप्रमाणे जागच्याजागी खिळून राहिली आहेत. पानावरील श्लोकांचे वाचन झाले की गुणाढ्य ते पान अग्निकुंडात टाकीत आहे, असे अंत:करण हेलावणारे दृश्य पाहून राजाला आपल्या मूर्खपणाचा

पश्चातात्त झाला. तो धावत पुढे गेला व गुणाढ्याचे पाय धरून राजाने त्याची क्षमा मागितली.

राजाने हे काय चालले आहे असे गुणाढ्यास विचारले. तेव्हा गुणाढ्याने पैशाची भाषेत सर्व हकीकत सांगितली. तेव्हा गुणाढ्य म्हणजे शिवगणाचा अवतार आहे असे जाणून राजाने पुन्हा त्याला नम्रपणे वंदन केले. आणि सात विद्याधरांच्या सात दिव्य कथा सांगण्याची विनंती केली. तेव्हा राजाकडे पाहात शांतपणे गुणाढ्य म्हणाला, "राजा, सात वर्षे अहोरात्र कष्ट करून मी त्या सात कथा सात लाख श्लोकात रचल्या. तू गुणी व विद्वान म्हणून मी त्या तुझ्याकडे पाठवल्या. पण दुर्दैवाने तू त्यांचा स्वीकार न करिता परत पाठवल्यास. आता काय उपयोग! कारण त्यातील सहा लक्ष श्लोकांची पाने या होमकुंडात भस्म झाली आहेत. आता फक्त एका विद्याधरांची एक लक्ष श्लोकांची कथा शिल्लक राहिली आहे, ती मी तुला देतो. ती कथा पैशाची भाषेत आहे. पण माझे हे दोन शिष्य ती तुला स्पष्ट करून सांगतील." असे म्हणून गुणाढ्याने आपले शिष्य गुणदेव व नंदिदेव यांच्याकडे आपला हात केला.

एवढे बोलून गुणाढ्याने उरलेली एक लक्ष श्लोकांची बृहत्कथा राजाच्या हाती दिली व तो तपश्चर्येला निघून गेला. पुढे त्याने योगमार्गाने देहत्याग केला आणि तो पूर्वीप्रमाणे माल्यवान नावाचा शिवगण बनला. इकडे गुणाढ्याने दिलेली बृहत्कथा घेऊन राजा नगरास परत गेला. त्याने गुणाढ्याच्या गुणदेव व नंदिदेव या शिष्यांना पुष्कळ द्रव्य, हत्ती, घोडे देऊन संतुष्ट केले. पुढे सातवाहन राजाने अद्भुतरम्य अशी ती बृहत्कथा सर्व भारतात लोकप्रिय केली.

# मित्र असावा असा

पुष्करावती नावाचे एक नगर होते. गूढसेन हा त्या नगराचा राजा होता. त्याला एकच मुलगा होता. तेव्हा राजाराणीने त्याचे फार फार लाड केले. त्यामुळे झाले काय की तो मुलगा मन मानेल तसे वागणारा व स्वच्छंदी निघाला. साहाजिकच नेहमीच त्याच्या हातून बरे बाईट घडे. त्याचे अशा प्रकारचे वागणे राजाराणीला पसंत पडे. फाजिल लाडामुळे मुले बिघडतात हे राजाला कळत नव्हते असे नव्हे. पण त्याला काही उपाय नव्हता.

एकदा काय झाले, उद्यानात फिरत असताना राजपुत्राला आपल्याच वयाचा एक तरुण दिसला. तो वैभवाने व शरीराकृतीने राजपुत्रासारखाच होता. तो तरुण ब्रह्मदत्त नावाच्या एका व्यापाऱ्याचा मुलगा होता. तो आपल्याला मित्र म्हणून साजेसा होईल, म्हणून राजपुत्राने स्वत: पुढे होऊन त्याच्याशी मैत्री केली. दिवसेंदिवस त्या दोघांची मैत्री वाढू लागली. ते परस्परावर एवढे प्रेम करू लागले की, क्षणभरही एकमेकाला सोडून दूर राहणे त्यांच्या जिवावर येऊ लागले. जन्मांतरीची ओळख ताबडतोब प्रेम उत्पन्न करते हे खरेच आहे.

पुढे राजपुत्राचा विवाह ठरला. त्यासाठी तो हत्तीवर बसून आपल्या सैन्यपरिवारासह अहिछत्र नावाच्या नगराकडे निघाला. राजपुत्राबरोबर त्याचा मित्रही हत्तीवर बसलेला होता. प्रवास करतांना संध्याकाळ झाली. तेव्हा इच्छामती नदीच्या तीरावर येऊन पोहोचताच राजपुत्राने तिथे मुक्काम केला. रात्री चंद्रोदयं झाल्यावर राजपुत्राच्या दाईने त्याला एखादी सुंदर गोष्ट सांगण्याची विनंती केली. तेव्हा राजपुत्राने एक गोष्ट सांगण्यास सुरवात केली. पण प्रवासाने तो थकलेला असल्यामुळे तो गोष्ट सांगता सांगता झोपी गेला. गोष्ट अर्धवटच राहिली.

राजपुत्राची दाई व इतर सेवकही स्वस्थ झोपी गेले. फक्त झोप आली

नव्हती ती त्या व्यापाऱ्याच्या पुत्राला. तो मात्र जागाच होता. एकाएकी त्याने आकाशात स्त्रियांचा आवाज ऐकला. तो आवाज, तो कान देऊन ऐकू लागला. तो आवाज राजपुत्र सांगत असलेली सुंदर कथा ऐकण्यासाठी आकाशात जमलेल्या देवतांचा होता. त्यातील एक देवता म्हणाली, "हा पापी राजपुत्र कथा अर्धवट सांगूनच झोपी गेला आहे, म्हणून माझा .याला शाप आहे की, सकाळी त्याला एक पुष्पमाला दिसेल. जर त्याने ती उचलून आपल्या गळ्यात घातली तर त्या क्षणी तो मृत्यु पावेल." दुसरी म्हणाली, "सुदैवाने या संकटातून तो सुखरूप राहिला तर त्याला फळांनी भारावलेले एक आंब्याचे झाड दिसेल. त्या झाडाचे आंबे खाताच तो निष्प्राण होईल!" असे म्हणून दुसरी देवता स्वस्थ राहिली. तेव्हा तिसरी म्हणाली, "राजपुत्र या संकटातूनही वाचला तर लग्नाकरिता ज्या मंदिरात तो पाऊल टाकील ते मंदिरच त्याच्या अंगावर कोसळून तो मरेल." तिसरीचे बोलणे संपताच चवथी म्हणाली, "मृत्यूच्या या तीन सापळ्यातून जरी तो निसटला, तरी लग्नानंतर रात्री झोपण्यासाठी तो अंत:पुरात गेल्यावर त्याला शंभर शिंका येतील. त्या वेळी प्रत्येक शिंकेबरोबर "शतमूजीव" असं जर कोणी म्हटलं नाही तर तो कालवश होईल. आणि आतापर्यंत आमचं बोलणं ज्याच्या कानी पडलं आहे तो जर राजपुत्राच्या रक्षणाकरिता ते सगळं आधीच त्याला सांगेल तर तोही मृत्यूचा बळी होईल!" चौथीचे अशा प्रकारचे बोलणे संपताच त्या सर्व देवता तेथून निघून गेल्या.

त्या देवतांचे एखाद्या कठोर वज्राघातासारखे ते भयंकर बोलणे ऐकून राजपुत्राचा परमस्नेही असलेल्या वैश्यपुत्राला फार वाईट वाटले. तो स्वत:शी म्हणाला, "हा काय अनर्थ झाला! माझ्या प्रिय मित्राने कथा सांगण्यास सुरुवात करून त्याने तिची अखेर केली नाही. त्यामुळे अदृश्यपणे ती कथा ऐकण्यास आलेल्या देवतांचा त्याने मनोभंग केला. तेव्हा रागावून त्यांनी दिलेले शाप किती भयंकर आहेत! पण आता काय करायचं? एक गोष्ट मात्र खरी की आता यापुढे आपल्या प्राणप्रिय मित्राच्या प्राणाचे रक्षण आपण मोठ्या युक्तीने व जबाबदारीने केलं पाहिजे. घडलेली हकीकत आधी मित्राला सांगणं म्हणजे स्वत:वर मृत्यु ओढवून घेण्यासारखं आहे."

असा विचार करीत त्या वैश्यपुत्राने अर्धवट झोपेतच ती रात्र

घालविली. सकाळी राजपुत्राने आपल्या परिवारासह पुढे प्रवास सुरू केला. काही अंतरावर वाटेत राजपुत्राला रंगीबेरंगी सुगंधित फुलांचा असा एक सुंदर हार दिसला. तो चटकन उचलून आपल्या गळ्यात घालावा असा त्याला मोह झाला. पण जवळच असलेला त्याचा मित्र त्याला म्हणाला, "थांब मित्रा, तू त्या हाराला स्पर्श करू नकोस. तो खरा आहे, असं का तुला वाटतं ? तो तुझा भ्रम आहे. तसे नसते तर पुढे जाणाऱ्या तुझ्या सैनिकापैकी एकाला तरी तो दिसला नसता का ?"

असे आपल्या मित्राचे बोलणे ऐकूण राजपुत्राने त्या हाराकडे पुन्हा पाहिले नाही. तो पुढे निघाला. काही अंतरावर पिवळ्याजर्द आंब्यांनी भारावलेले एक भले मोठे झाड त्याच्या नजरेस पडले. त्या झाडावरील टपोरे रसाळ आंबे पोटभर खावेत अशी राजपुत्रास इच्छा झाली. पण तसे करण्यापासून वैश्यपुत्राने त्याला परावृत्त केले. तो म्हणाला, "जवळपास झाडी नसताना वाटेवर हे मोह घालणारे एकच आंब्याचे झाड कसे ? तेव्हा त्या झाडाच्या एकाही आंब्याला हात न लावता पुढे मार्गक्रमण करणे हे चांगले !" राजपुत्राने असे आपल्या मित्राचे म्हणणे ऐकले व तो मुकाट्याने पुढे निघाला.

पुढे ज्या नगरात राजपुत्रचा विवाह होणार होता त्या नगराच्या प्रवेशद्वाराशी राजपुत्र आपल्या परिवारासह येऊन पोचला. तिथे त्याचे भावी सासरे आपल्या इष्टमित्रमंडळीसह उपस्थित होते. त्यांनी राजपुत्राचे भव्य स्वागत केले. नंतर वाजत गाजत मोठ्या थाटाने मिरवत त्याला नगरात नेले. लग्नाचा मुहूर्त जवळ आला तेव्हा लग्नाकरिता खास सजविलेल्या एका मंदिरात राजपुत्र आपल्या मित्रासह पाऊल टाकणार तोच त्याच्या मित्राने राजपुत्राचा हात धरून त्याला मागे खेचले. त्याच क्षणी त्या मंदिराचे प्रवेशद्वार मोठा आवाज करीत धाडकन् खाली कोसळले.

तेव्हा दुसऱ्या एका सजविलेल्या मंडपात राजपुत्राचा विवाह समारंभ साजरा करण्यात आला. रात्री राजपुत्र झोपण्यासाठी अंत:पुरात गेला. तो तेथे जाण्यापूर्वी वैश्यपुत्र अत्यंत गुप्तपणे त्याच्या अगोदर अंत:पुरात जाऊन न दिसेल अशा ठिकाणी लपून बसला होता. राजपुत्र एका मंचकावर बसताच त्याला शंभर शिंका आल्या तेव्हा दडून बसलेल्या वैश्यपुत्राने "शतमूजीव"

असे राजपुत्राच्या प्रत्येक शिंकेबरोबर हलक्या आवाजात म्हटले. नंतर आपण योजिलेले कार्य सिद्धीस गेले असे पाहून त्याला फार हर्ष झाला. तो अंतःपुरातून बाहेर पडू लागला. तोच राजपुत्राची नजर त्याच्याकडे गेली. तेव्हा त्याला आपल्या मित्राचा भयंकर संताप आला. चटकन् अंतःपुरातून बाहेर पडून त्याने आपल्या सेवकास म्हटले, "माझ्या अंतःपुरांत शिरलेल्या त्या दुष्टाला सकाळपर्यंत बांधून ठेवा. सकाळी मी त्याला शिक्षा देईन!"

त्याप्रमाणे राजसेवकाने वैश्यपुत्राला सकाळपर्यंत बांधून ठेवले. सकाळी राजपुत्राने त्याला देहदंडाची शिक्षा दिली. तेव्हा राजसेवक त्याला वध्यभूमीकडे घेऊन जाऊ लागले. त्यावेळी वैश्यपुत्र त्यांना म्हणाला, " बाबांनो, माझी एक विनंती ऐका. मला प्रथम राजपुत्राच्या भेटीस न्या. मला त्याला काही हकीकत सांगायची आहे. नंतर तुम्ही मला खुशाल ठार मारा!"

असे त्या वैश्यपुत्राचे बोलणे ऐकून त्या राजसेवकांनी तसेच ते राजपुत्राला सांगितले. आपल्या मित्राची भेट घ्यावी असे राजपुत्राला मुळीच वाटत नव्हते. पण त्याच्या सचिवांनी त्याला खूप आग्रह केला. अखेर राजपुत्राने त्या वैश्यपुत्राला आपल्यासमोर आणण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे वैश्यपुत्राला राजपुत्रासमोर हजर करण्यात आले. वैश्यपुत्राने राजपुत्राला रात्रीच्या वेळी आपण ऐकलेले देवतांचे शाप व त्याप्रमाणे तसेच पुढे आलेले अनुभव सांगितले. तेव्हा सुगंधित पुष्पमाळ, मन मोहून घेणारे आंब्यांनी लवलेले झाड, विवाहसमयी कोसळलेले मंदिर व अंतःपुरात एकाएकी आलेल्या शंभर शिंका या सर्व अकल्पितपणे घडलेल्या घटनावरून आपला मित्र खरे बोलत आहे अशी राजपुत्राची खात्री झाली. नंतर त्याने वैश्यपुत्राला अविचाराने दिली गेलेली शिक्षा माफ केली व संशयरहित होऊन पूर्वीप्रमाणे त्याचा स्नेह संपादन केला.


पुढे राजपुत्र आपल्या पत्नीस घेऊन मित्राबरोबर आपल्या पुष्करावती नगरास परत गेला. या घटनेनंतर राजपुत्र व वैश्यपुत्र यांच्या मैत्रीत कधीही बिघाड झाला नाही.

# देवाची देणगी

कोण्या एका नगरात हरिशर्मा नावाचा एक गृहस्थ राहात होता. तो दरिद्री व मूर्ख होता. काही उद्योगधंदा करणे त्याला आवडत नसे. उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन त्याच्यापाशी नव्हते. अशा परिस्थितीत संसाराचा गाडा चालविणे त्याला नेहमीच कठीण जाई. तेव्हा त्याला वाटले, गाव सोडून एखाद्या मोठ्या नगरात जावे. तिथे एखाद्या श्रीमंत माणसाच्या घरी जाऊन आपण त्याला आपल्या स्वतःसाठी, आपल्या बायको मुलांसाठी काही काम मागावे, असा विचार करून एके दिवशी त्याने आपल्या घरातील सर्व मंडळींना घेऊन आपले गाव सोडले व जवळच असलेल्या एका नगराकडे तो निघाला.

यथावकाश त्या नगरास पोहोचल्यावर हरिशर्म्यांने स्थूलदत्त नावाच्या एका मोठ्या श्रीमंत माणसाचा आश्रय घेतला. हरिशर्मा स्थूलदत्ताचा नोकर झाला. आपल्या बायकोला त्याने मोलकरीण बनविले व स्थूलदत्ताच्या गाई राखण्याचे काम त्याने आपल्या मुलास मिळवून दिले. पुढे काही दिवसांनी स्थूलदत्ताने आपल्या कन्येचा विवाहसमारंभ मोठ्या थाटाने करण्याचे निश्चित केले. त्या निमित्ताने स्थूलदत्ताच्या घरी इकडून तिकडून खूप पाहुणे जमा झाले. तेव्हा हरिशर्मा व त्याच्या कुटुंबातील माणसांना वाटले, आता आपली खाण्यापिण्याची खूप चंगळ होणार. बऱ्याच दिवसात आपणास काहीही गोडधोड मिळालेले नाही. आता नानाप्रकारची पक्वान्ने आपल्याला खावयास मिळतील. कोणकोणती पक्वान्ने किती किती खाऊ असे आपल्याला होऊन जाईल अशा प्रकारचे त्या सर्वांचे मनोराज्य चालले होते.

पण हरिशर्म्याच्या दुर्दैवाने लग्नसमारंभाच्या धांदलीत त्याच्याकडे व त्याच्या कुटुंबियाकडे घरातील कोणाही माणसाचे लक्ष गेले नाही. अखेर झाले काय की थाटात साजऱ्या झालेल्या लग्नसमारंभाच्या दिवशी त्या बिचाऱ्यांना रिकाम्या पोटी राहावे लागले. रात्री हरिशर्मा आपल्या बायकोला म्हणाला, "मी दरिद्री व मूर्ख म्हणून मला कोणीच विचारीत नाही. कोणी चांगलेही म्हणत नाही.



सर्वत्र माझी अवहेलनाच होते. तेव्हा आता काहीतरी एक अशी चांगली युक्ती योजिली पाहिजे की, त्यायोगे मी आपल्या धन्याच्या विश्वासास व गौरवास पात्र होईन. तशी वेळ आली म्हणजे तू मात्र 'मी शहाणा आहे. सर्वज्ञानी आहे', असे आपल्या धन्याला सांगण्यास विसरू नकोस हं!"

असे म्हणून आता पुढे आपण काय करणार आहोत ते तिला हरिशर्म्याने सांगितले. मध्यरात्रीच्या सुमारास वाड्यात सर्वत्र निजानीज झाल्यानंतर हरिशर्मा उठला आणि पाय न वाजवता हळूच तबेल्याकडे गेला. तिथे बांधून ठेवलेल्या जावईबापूच्या घोड्याला त्याने चुचकारून व त्याच्या पाठीवर थाप मारून तबेल्यातून बाहेर काढले. नंतर त्याला घेऊन हरिशर्मा नगराबाहेरच्या एका अरण्याकडे गेला. तेथील एका भल्यामोठ्या झाडाच्या बुंध्याला त्याने घोड्याला बांधून ठेवले आणि मुकाट्याने परत येऊन तो स्वस्थपणे झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी जावईबुवा तबेल्यात जाऊन पाहतात तो त्यांचा घोडा गायब झालेला. तेव्हा स्थूलदत्ताच्या वाड्यात सर्वत्र गोंधळ माजला. रात्रीतून घोड्याचे काय झाले असा सर्वांना प्रश्न पडला. घोड्याच्या शोधार्थ

सर्वत्र धावपळ सुरू झाली. पण त्याचा कोणालाही ठावठिकाणा लागला नाही. घोडा काही सापडला नाही. जावईबुवांचा घोडा हरवला हे काही चांगले झाले नाही, असे स्थूलदत्ताला वाटले. तो फार कष्टी झाला. तेव्हा हरिशर्म्याची बायको आपल्या धन्याकडे गेली व म्हणाली, "धनी, मी काय सांगते ते कृपा करून ऐका. माझा नवरा शकून पाहतो. तो मोठा ज्योतिषी आहे. तुम्ही त्याला का विचारत नाही ? तुमच्या जावयाचा घोडा कोठे आहे हे तो बरोबर सांगेल. अशी माझी खात्री आहे."

तेव्हा स्थूलदत्ताने ताबडतोब हरिशर्म्याला बोलावले. हरिशर्मा तेथे येताच प्रथम तो आपल्या धन्याला म्हणाला, "धनी, काल आपण आम्हा सर्वांना उपाशी पोटी झोपायला लावले. मला वाटतं आपल्याला हे माहीत नसेल." असे हरिशर्म्याचे शब्द ऐकताच स्थूलदत्ताने त्याची क्षमा मागितली. आणि तो म्हणाला, "मला आता तुला काही विचारायचं आहे. तू चांगला ज्योतिषी आहेस असं मला कळलंय तेव्हा माझी एक अडचण तू दूर करशील का ?" "ज्योतिषाच्या साहाय्याने ही अडचण दूर करता येत असेल तर आपल्यासाठी ते काम मी अवश्य करीन." असे हरिशर्म्याने सांगताच स्थूलदत्त म्हणाला, "रात्री तबेल्यात बांधून ठेवलेला आमच्या जावईबुवांचा घोडा नाहीसा झाला आहे. त्याचा खूप शोध केला पण अद्यापपर्यंत तो हाती लागला नाही. तेव्हा तो कोठे नेला आहे ? हे तू सांग. तू घोडा सापडून दिलास तर तुला मी चांगले बक्षिस देईन."

असे आपल्या धन्याचे बोलणे ऐकून हरिशर्मा काही क्षण वर पाहात स्तब्ध उभा राहिला. नंतर त्याने आपली बोटे पुन्हा पुन्हा मोजली. पुष्कळ विचार केल्यासारखे दाखवले. नंतर तो गंभीर मुद्रेने म्हणाला, "धनी, काही चोरांनी जावईबुवांचा घोडा तबेल्यातून चोरून नेला आहे. त्यांनी तो नगराजवळच्या अरण्यातील एका भल्या मोठ्या झाडाला बांधून ठेवला आहे. ते चोर दुपारी त्याला तेथून घेऊन जाणार आहेत. म्हणून आताच धावत पळत जाऊन तो घोडा परत मिळवा."

हरिशर्म्याने सांगितल्याप्रमाणे स्थूलदत्ताने आपले काही सेवक अरण्याकडे पिटाळले. थोड्याच वेळात ते घोड्यासह परत आले. तेव्हा स्थूलदत्ताला फार आनंद झाला. तेथे असलेले सर्व लोक हरिशर्म्याची एक चांगला ज्योतिषी म्हणून स्तुती करू लागले. त्या दिवसापासून स्थूलदत्ताच्या घरी

हरिशर्म्याला व त्याच्या कुटुंबियांना चांगल्या रीतीने वागवण्यात येऊ लागले.

पुढे काही महिन्यांनी त्या नगरातील राजाच्या रत्नभांडारातून सुवर्णजडित व रत्नजडित दागिन्यांची मोठी चोरी झाली. चोरी कोणी केली ते कळून घेण्यासाठी दरबारी मंडळींनी खूप प्रयत्न केला. पण चोर सापडला नाही. आणि अलंकारही सापडले नाहीत. एक चांगला ज्योतिषी म्हणून हरिशर्म्याची नगरात ख्याती झाली होती. तेव्हा राजाकडून त्यास बोलावणे आले. आता राजासमोर उभे राहायचे आणि त्याच्या रत्नभांडारातून दागिने कोणी चोरले हे सांगायचे म्हणजे महाकठीण कर्म होते. म्हणून हरिशर्मा मनात खूप घाबरून गेला होता. आता आपली चांगलीच फजिती होणार असे त्याला वाटले. पण अखेर त्याला राजवाड्यात जावेच लागले.

राजासमोर उभे राहताच हरिशर्मा हात जोडून म्हणाला, "महाराज, आज्ञा व्हावी ?" "आमच्या रत्नभांडारातून सुवर्ण व रत्नजडित दागिन्यांची चोरी झाली आहे. ती चोरी कोणी केली, ते सांग." राजा म्हणाला. त्या क्षणी हरिशर्म्याला काहीच सांगता येणे शक्य नव्हते. तो राजाला म्हणाला, "महाराज, या प्रश्नाची कुंडली वगैरे मांडून सर्व बाजूंनी विचार करायला पाहिजे. क्षमा करा. मला या घटकेला आपल्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही, मी ते आपल्याला उद्या मात्र निश्चितपणे सांगेन." "ठीक आहे" असे म्हणून राजाने आपल्या राजवाड्यातच हरिशर्म्याच्या राहाण्याची व्यवस्था केली. कदाचित तो पळून जाईल म्हणून राजाने त्याच्यावर गुप्तपणे पहारा ठेवला.

त्या राजवाड्यात 'जिव्हा' या नावाची एक दासी होती. खरे म्हणजे ती व तिचा भाऊ हेच चोर होते. त्यांनी राजाच्या भांडारातील दागिने चोरले होते. चोराच्या मनात चांदणे या न्यायाने हरिशर्म्याच्या राजवाड्यातील मुक्कामामुळे 'जिव्हे'ला त्याची भीती वाटू लागली. आपण चोरी केली ही गोष्ट ज्योतिषाच्या साहाय्याने कळून घेण्याचा प्रयत्न तो करणारच. आता तो काय करतो ते आपण पाहावे असा विचार करून 'जिव्हा' हलक्या पावलांनी जाऊन खोलीच्या दाराला कान लावून उभी राहिली.

दुर्दैवाने आपण आता फार मोठ्या आपत्तीत सापडलो आहोत. राजाची गैरमर्जी म्हणजे महाभयंकर गोष्ट, हे जाणून खोलीत एकटाच बसलेला बिचारा हरिशर्मा स्वतःलाच दोष लावून घेऊ लागला. आणि मी शहाणा आहे, सर्वज्ञानी आहे, ज्योतिषी आहे असे असत्य सांगणाऱ्या आपल्या जिव्हेची निंदा

करीत तो म्हणाला, "जिव्हे, सुखाच्या मागे लागून तू काय केलेस हे! दुष्टे, आता भोग आपल्या कर्माची फळं! आता राजा जी शिक्षा देईल ती सहन करण्यास तयार हो!"

असे हरिशर्म्याचे शब्द ऐकून खरोखरच या सर्वज्ञ हरिशर्म्याने आपण चोर आहोत हे ओळखले आहे, असे जाणून ती जिव्हा नावाची दासी भीतीने थरथर कापू लागली. हरिशर्म्याला दार उघडण्याची विनंती करून ती आत गेली, आणि त्याचे पाय घट्ट धरून गयावया करीत म्हणाली, "महाराज, आपण मला चोर म्हणून बरोबर ओळखलं आहे. मीच राजाच्या रत्नभांडारातून दागिने चोरले आहेत. ते मी राजवाड्याच्या पाठीमागे असलेल्या बागेत एका डाळिंबाच्या झाडाखाली पुरून ठेवले आहेत. माझ्यावर कृपा करा. आपली बहीण म्हणून माझे रक्षण करा. माझ्याजवळ असेल नसेल तेवढं सोनं मी तुम्हाला देईन."

दीन होऊन रडणाऱ्या जिव्हा दासीचे असे शब्द ऐकून हरिशर्मा आश्चर्याने थक्क झाला. मनातल्या मनात त्याला खूपच आनंद झाला. पण तसे त्या दासीला दिसू न देता तो मोठ्या रुबाबात तिला म्हणाला, "जिव्हे, आता तू जा. मला सर्व ज्ञात झालं आहे. पण लक्षात ठेव तू मला शरण आलेली आहेस. तुझं नाव मी कोणालाही सांगणार नाही. तुझ्याजवळचं सोनं मात्र तू मला नंतर देण्यास विसरू नकोस हं!" असे हरिशर्म्याचे धीराचे शब्द ऐकून जिव्हेला हायसे वाटले. ती तेथून निघून गेल्यानंतर हरिशर्मा आश्चर्याने स्वतःशी म्हणाला, "दैवाची कृपा असली म्हणजे अशक्य गोष्टही सहज शक्य होते. मी महान संकटात सापडलो म्हणून आपल्या जिव्हेला दूषणे दिली, आणि काय गम्मत झाली पहा! चोरी करणारी जिव्हा नावाची दासी माझ्यापुढे येऊन उभी राहिली. दैवाची विचित्र लीला म्हणतात ती अशी! गुप्तपणे पाप करणारा पापी केवळ भीतीनेच स्वतःला प्रगट करीत असतो."

त्या रात्री आनंदित झालेल्या हरिशर्म्याला गाढ झोप लागली. सकाळी राजाची भेट घेऊन तो राजाला म्हणाला, "महाराज आपले चोरीला गेलेले दागिने कोठे आहेत, ते मला कळलं आहे. चला माझ्याबरोबर, ते जिथे आहेत ती जागा मी तुम्हाला दाखवतो." असे म्हणून हरिशर्म्याने राजाला राजवाड्याच्या मागील बाजूस असलेल्या बागेतील डाळिंबाच्या झाडाखाली नेले. आणि त्याला दागिने पुरलेली जागा दाखवली.

राजाने ती सेवकाकडून खणून काढताच राजाला आपले बहुतेक सर्व सुवर्ण व रत्नजडित दागिने मिळाले. त्यातील एक दोन दागिने कमी आहेत असे राजाने सांगताच हरिशर्मा त्याला म्हणाला, "महाराज, तेवढे दागिने घेऊन चोर आता खूप दूर गेला आहे. त्याला पकडण्याचा विचार करण्यात काहीही अर्थ नाही." या घटनेने आनंदित झालेला राजा हरिशर्म्याला एक गाव बक्षिस देऊ लागला. तेव्हा राजाचा 'ज्ञानी' या नावाचा एक मंत्री राजाच्या कानात कुजबुजला, "महाराज, शास्त्राच्या अभ्यासामुळेच मनुष्याला अगम्य असलेले ज्ञान प्राप्त होते. हरिशर्म्याबद्दल मला संशय वाटतो. मला वाटतं या धूर्त माणसाने चोराशी संगनमत करून पैसे उपटण्याची युक्ती योजिली असावी. तेव्हा पुन्हा एकदा त्याची परीक्षा घ्यावी!"

असे आपल्या मंत्र्याचे बोलणे राजालाही खरे वाटल्यास नवल ते काय? हरिशर्मा खरोखरच विद्वान व ज्ञानी आहे की काय ते पाहण्याकरिता राजाने त्याला दुसऱ्या दिवशी सकाळी दरबारात आपली भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी हरिशर्मा दरबारात दाखल झाला. तेव्हा जिचे तोंड बांधलेले आहे अशी एक नवी कोरी घागर हरिशर्म्यासमोर आणून ठेवली गेली. त्या घागरीत राजाने एक मंडूक म्हणजे बेडूक घालून ठेवलेला होता. त्या घागरीकडे हात करून राजा हरिशर्म्याला म्हणाला, "हरिशर्मा, या घागरीत काय आहे ते मला सांग! जर तू बिनचूक सांगितलेस तर मी तुझा फार मोठा सत्कार करीन."

असे राजाचे शब्द ऐकून आता आपला नाश जवळ आला अशी हरिशर्म्याची खात्री पटली. बालपणी आपल्या वडिलांनी मंडूक असे ठेवलेले आपले नाव त्याला चटकन् आठवे. अतिशय खिन्न झालेला हरिशर्मा एकदम स्वतःशी मोठ्यांदा म्हणाला, "अरे गरीब बिचाऱ्या मंडूका, अखेर तुझ्या नाशाला ही घागरच कारणीभूत झाली!" असे हरिशर्म्याच्या तोंडून बाहेर पडलेले शब्द ऐकताच, "वा! वा! खरोखर हरिशर्मा सर्वज्ञानी आहे!" असे म्हणून राजासह सर्व दरबारीजन हरिशर्म्याची स्तुती गाऊ लागले. नंतर राजाने हरिशर्म्याचा मोठा सत्कार केला. त्याला अनेक गावे, द्रव्य, छत्र व वाहने दिली. एका क्षणात सर्वनाशाच्या खाईतून सुटलेला हरिशर्मा एखाद्या राजाप्रमाणे वैभवशाली झाला. अखेर दैवानेच हरिशर्म्याला भाग्यवंत केले.

# दुष्कर्माचे फळ

फार वर्षापूर्वी गंगा नदीच्या काठी मार्करिका नावाची एक नगरी होती. त्या नगरीत मौनव्रत धारण केलेला एक बैरागी राहात होता. त्याचा शिष्यपरिवार फार मोठा होता. तो एका देवळाजवळ असलेल्या मठामध्ये वास्तव्य करी. नगरात रोज माधुकरी मागून तो अपला उदरनिर्वाह करीत असे.

एके दिवशी तो बैरागी नेहमीप्रमाणे माधुकरी मागण्यासाठी गावातील घरोघरी जाऊ लागला. तेव्हा एका वैश्याच्या घरातील एक सुंदर व तरुण कन्या त्याला माधुकरी वाढण्यासाठी पुढे आली. त्या कन्येबरोबर तिचे वडीलही होते. तेव्हा त्या बैराग्याने आपले मौनव्रत सोडले आणि तो उद्‌गारला, "अरे ! अरे ! फार वाईट !" असे म्हणून चौपदरीत वाढलेली माधुकरी घेऊन तो चालू लागला. तेव्हा त्या कन्येचे वडील त्याच्यामागून गेले. आणि नमस्कार करून त्याला म्हणाले, "महाराज, आपण आज मौन सोडून एकाएकी तसे का उद्‌गारलात ?"

तेव्हा तो धूर्त बैरागी मिस्कील हसत म्हणाला, "बाबारे, तुझी ती कन्या दुर्लक्षणी आहे. लक्षात ठेव. तिचं जेव्हा लग्न होईल, तेव्हा तिचे बाप, आई, भाऊ वगैरे सर्वांचा नाश होईल. वरून सुंदर दिसणाऱ्या तुझ्या मुलीचे हे वाईट लक्षण पाहून मला दुःख झाले. त्यामुळे तसे बोलून गेलो. तू माझ्या चांगल्या भक्तापैकी एक आहेस म्हणून तुझ्यासाठी न बोलण्याचे व्रत सोडून सुद्धा मी तुला ही गुप्त गोष्ट सांगितली." असे त्या बैराग्याचे शब्द ऐकताच तो वैश्य अतिशय कष्टी व दुःखी झाला. तेव्हा तो ढोंगी बैरागी त्याला म्हणाला, "अरे, असा दुःखी होऊ नकोस. त्या मुलीचं दैव दूर करण्याचा एक उपाय आहे तो मी तुला सांगतो. ऐक !"

"त्या तुझ्या दुदैवी मुलीला तू रात्रीच्या वेळी एका मोठ्या पेटीत घाल. त्या पेटीचे तोंड बंद कर आणि तिच्यावर एक दिवा ठेव. नंतर ती पेटी गंगा नदीत सोडून दे. तुमच्या घराण्याचे कल्याण करण्याचा हा एकमेव उपाय

आहे." असे बोलून तो बैरागी आपल्या मठाकडे निघून गेला. त्या दिवशी रात्री त्या बिचाऱ्या वैश्याने बैराग्याने सांगितल्याप्रमाणे करून ती दिवा स्थापित पेटी गंगेत सोडली. तिकडे त्या बैराग्याने संध्याकाळी आपल्या शिष्यांना सांगितले, "रात्रीच्या पहिल्या प्रहरी तुम्ही गंगेवर जा. तिच्या प्रवाहातून जिच्यावर एक दिवा ठेवला आहे, अशी एक पेटी वाहात जात असलेली तुम्हाला दिसेल. ती पेटी नदीतून काढून मठात माझ्याकडे घेऊन या !" काही क्षण थांबून तो बैरागी पुढे म्हणाला, "त्या पेटीतून कोणी रडण्याचा किंवा हुंदके देत असल्याचा आवाज तुम्हाला जरी ऐकू आला तरी लक्षात ठेवा, तुम्ही त्या पेटीचे झाकण मुळीच उघडू नका," त्याप्रमाणे करण्यासाठी त्या लबाड वैराग्याचे शिष्य गंगेवर गेले.

कर्मधर्म संयोगाने गंगा नदीतून वाहात चाललेली ती दीपयुक्त पेटी रात्रीच्यावेळी नदीकाठी फिरण्यास आलेल्या एका राजपुत्राच्या नजरेस पडली. त्याने ती आपल्या सेवकांकडून नदीतून काढून काठावर आणविली. राजपुत्र पुढे झाला आणि त्याने पेटीचे झाकण उघडले. आत एक सुंदर रमणी दिसताच तो आश्चर्याने थक्क झाला. त्या वैश्यकन्येने आपली सर्व हकीकत त्याला सांगितली. तेव्हा त्या दयाशील राजपुत्राने आपल्याला हीच योग्य भार्या आहे असे ठरवून तिच्याशी गांधर्व विधीने विवाह केला.

नंतर ज्या दुष्ट बैराग्याने असे राक्षसी कृत्य केले होते त्याला चांगला धडा मिळावा म्हणून त्या चतुर राजपुत्राने एक युक्ति योजिली. त्याने आपल्या सेवकाकडून एक भयंकर मोठा वानर आणला. तो वानर त्या पेटीत बसवून तिचे झाकण बंद केले. नंतर पेटीवर एक जळता दीप ठेवून ती पेटी राजपुत्राने आपल्या सेवकाकडून गंगेच्या प्रवाहात सोडली. ती प्रवाहातून वाहात चाललेली पेटी बैराग्याच्या शिष्यांनी पाहिली. त्यांनी ती लगबगीने वर काढून मठात नेली. ती पेटी पाहून त्या ढोंगी बैराग्याला खूप आनंद झाला. तो आपल्या शिष्यांना म्हणाला, "तुम्ही आता स्वस्थ झोपा. मी आता एकटाच ही पेटी माडीवर नेऊन मंत्रसिद्धीला सुरुवात करतो. काही आरडाओरड तुम्हाला ऐकू आली तरीसद्धा तुम्ही इकडे यऊ नका. समजलं !"

असे आपल्या शिष्यांना सांगून त्या दुष्ट बैराग्याने ती पेटी माडीवर

नेली. आता ती सुंदर वैश्यकन्या आपलीच होणार या कल्पनेने त्याने पेटीचे झाकण उघडले. त्याबरोबर क्रोधाने चिडलेला तो भयंकर वानर पेटीतून उडी मारून बाहेर पडला. प्रथम त्याने बैराग्याला चावे घेऊन त्याचे नाक व कान तोडले. आणि नंतर आपल्या दातांनी व नखांनी त्याचे सर्व अंग रक्तबंबाळ केले. बैराग्याच्या मोठ्या किंकाळ्या त्याच्या शिष्यांनी ऐकल्या पण त्याच्या आज्ञेप्रमाणे ते तिकडे गेले नाहीत. अखेर किंकाळ्या वाढल्या तेव्हा ते गुरूची सुटका करण्यासाठी धावले. वानर केव्हाच मठातील भिंतीवरून उडी मारून पळाला होता.

अशा रीतीने त्या बैराग्याला आपल्या दुष्कर्माचे चांगले फळ मिळाले !

# चतुर उंदीर

फार फार वर्षापूर्वी विदिशा नगराच्या बाहेर एक मोठे वडाचे झाड होते. तिथे मुंगूस, घुबड, मांजर व उंदीर असे चार प्राणी राहात होते. त्यांची घरे मात्र स्वतंत्र होती. उंदीर व मुंगूस झाडाच्या बुंध्याशी असलेल्या बिळात राहत. मांजर झाडाच्या एका ढोलीत तर घुबड झाडाच्या शेंड्यावर बसे. मुंगुस, घुबड व मांजर यांना उंदरास मारणे शक्य होते. मांजराला बाकीच्या तिघांना मारणे शक्य होते. म्हणून भक्ष्य मिळविण्यासाठी मुंगूस व उंदीर मांजराच्या भीतीने रात्री बाहेर पडत. घुबडही रात्रीच बाहेर पडे. फक्त एकटे मांजर मात्र निर्भयपणे दिवसा तसेच रात्रीही भक्ष्यासाठी वाटेल तेथे भटकत असे.

त्या वडाच्या झाडाजवळच एक मोठे शेत होते. तेथे उंदीर सापडतील या आशेने मांजर नेहमी जात असे. उंदीर, मुंगुस व घुबडही ठरलेल्या वेळी त्या शेताकडे जात असत. एकदा काय झालं, एक पारधी त्या शेतात गेला. तिथे त्याला मांजराच्या पाऊलखुणा दिसल्या तेव्हा त्याने मांजराला पकडण्याकरिता त्या शेतात एक जाळे लावून ठेवले, आणि तो निघून गेला. रात्री नेहमीप्रमाणे उंदराच्या आशेने मांजर त्या शेतात गेले. आणि त्या जाळ्यात सापडले. थोड्या वेळाने शेतातील धान्याचे कण खाण्याकरिता उंदीर लपत छपत तेथे गेला. तेव्हा जाळ्यात अडकलेले मांजर त्याला दिसले. ते पाहून तो आनंदाने नाचू लागला.

नंतर उंदीर धान्याचे कण खाण्यासाठी इकडे तिकडे फिरू लागला. त्याच वेळी तेथे मुंगूस व घुबड हे दोघेही आले. मांजर जाळ्यात अडकून पडले आहे. असे पाहून त्या दोघांनाही उंदरास पकडण्याची इच्छा झाली. उंदराने त्यांना दुरूनच पाहिले होते. तेव्हाच तो खिन्न होऊन विचार करू लागला होता. "घुबड व मुंगूस यांचा शत्रू म्हणजे मांजर. त्याच्याकडे जावे तर ते एका क्षणात माझा निकाल लावील. त्याच्यापासून दूर जावे तर हे दोघे मला मारून टाकतील. आता मीच संकटातून कसा पार पडू ? मी आणि मांजर दोघेही प्राणसंकटात सापडलो आहोत तेव्हा मांजराच्या आश्रयाला जाणं बरं. आपल्या दातांनी जाळे

तोडून मी मांजराचा प्राण वाचवीन. आणि उपकारकर्ता म्हणून ते मांजर माझं रक्षण करील."

असा विचार करून उंदीर हलकेच मांजराजवळ गेला आणि त्याला म्हणाला, "मित्रा, तू जाळ्यात सापडला आहेस, हे पाहून मला फार दुःख वाटतं. मी जाळं तोडून तुला मोकळं करतो. सहवासामुळे सरळ स्वभावाच्या प्राण्याची शत्रूशीही मैत्री जडते. पण तुझ्या मनात काय आहे, ते मला कळल्याशिवाय मी कसा तुझ्यावर विश्वास ठेवू ?" असे उंदराचे बोलणे ऐकून मांजर त्याला म्हणाले, "मित्रा उंदरा, माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव. माझा प्राणदाता म्हणून तू आजपासून माझा मित्र होणार. जिवाभावाच्या मित्रासारखा मी तुझ्याशी वागेन."

मांजराने असे आश्वासन देताच उंदीर मांजराजवळ गेला तेव्हा आपल्या हातची शिकार निसटली हे पाहून कष्टी झालेले मुंगुस व घुबड तेथून चालते झाले. मग जाळ्यात धडपडणारे मांजर उंदराला म्हणाले, " मित्रा, लवकर लवकर जाळं तोडून मला मोकळं कर. रात्र संपत आली." उंदीर मोठा धूर्त होता. तो आपले दात करकर वाजवीत व हळूहळू जाळे तोडण्याचा बहाणा करीत राहिला. कारण तो पारधी येण्याची वाट पाहात होता.

अखेर रात्र संपली. सकाळी समोरून येत असलेला पारधी दिसू लागला. तेव्हा मांजर ओरडले, "मित्रा, आटप, आटप, पारधी आला. मला मोकळं कर." अशी मांजराची विनवणी चालू असता, पारधी जाळ्याजवळ आला. तेव्हा उंदराने चटकन् जाळे तोडले. मुक्त झालेले मांजर पारध्याच्या भीतीने पार पळून गेले. उंदीरही स्वतः पळत जाऊन आपल्या बिळात शिरला.

या प्रसंगानंतर उंदराने त्या मांजरावर पुन्हा कधीही विश्वास ठेवला नाही. एकदा मांजराने उंदराला मुद्दाम हाक मारून बिळाबाहेर बोलावले. तेव्हा उंदीर त्याला म्हणाले, "बाबारे, फक्त प्रसंगानेच शत्रू मित्र होतात. नेहमी नाही."


अशा रीतीने शहाणपणाने वागून उंदराने आपल्या शत्रूपासून स्वतःचे रक्षण केले.

# आश्चर्याची कथा

प्रतिष्ठान नगरात एक वैश्य राहात होता. त्याचे नाव होते मूषकवाणी. एकदा काय झाले, त्याच्या एका मित्राने त्याला विचारले, "तुला मूषकवाणी असे का म्हणतात ? कारण अशा प्रकारचे नाव लहानपणी कुणी ठेवत नाही. यापेक्षा पाळण्यातलं तुझं नाव चांगलंच असलं पाहिजे." "खरं आहे तुझं म्हणणं" मूषकवाणी म्हणाला, "पाळण्यात ठेवलेल्या माझ्या नावापेक्षा मूषकवाणी हेच नाव मला फार आवडतं. त्याचा मला अभिमान वाटतो. तुला आश्चर्य वाटेल. पण खरं सांगायचं म्हणजे एका मेलेल्या मूषकामुळेच मी धनवंत झालो आहे." असे मूषकवाण्याचे शब्द ऐकून त्याचा मित्र आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "अस्सं! ते कसे काय ?" तेव्हा मूषकवाणी म्हणाला, "ऐक ती कथा!"

"मी अगदी लहान होतो, तेव्हा माझे वडील वारले. आमच्या नातलगांनी गोड बोलून आमचे सर्व धन हिरावून घेतले. घरी माझी आई, आणि मी. कोणाही नातलगाने आम्ही अगदी निराधार परिस्थितीत असतानासुद्धा आम्हाला एका पैशानीही मदत केली नाही, उलट नातलगांनी आम्हाला फसवून आमच्या जवळ होते नव्हते ते सर्व लांबवले. मग माझ्या पालनपोषणासाठी आईला हालअपेष्टा सहन करीत मोलकरणीचे काम करणे भाग पडले. मी अगदीच लहान. तेव्हा निराधार स्थितीत एकटं राहणं सुरक्षित न वाटल्याने आम्ही माझ्या वडिलांच्या कुमारदत्त नावाच्या मित्राच्या घरी राहू लागलो. तिथे मी शाळेत जाऊ लागलो. लिहिणं, वाचणं व गणित शिकलो. पुढे एक दिवशी आई मला म्हणाली, "बाळा, तूं वैश्य आहेस. व्यापार करणं हेच आपलं ध्येय. तेव्हा तू आता काही उद्योगधंदा सुरू कर." तेव्हा मी म्हणालो, "आई, तुझं म्हणणं खरं आहे, पण आपण फार गरीब. व्यापार सुरू करण्याकरिता आपल्यापाशी भांडवल कुठाय ?"

तेव्हा माझी आई म्हणाली, "या नगरात विशाखिल नावाचा एक



श्रीमंत वाणी आहे. तो गरीब आणि कुलीन वैश्यांना व्यापारा करिता भांडवल देण्यास नेहमी तयार असतो. तू त्याच्याकडे जा आणि व्यापारासाठी थोडे भांडवल मागून घे." दुसऱ्या दिवशी आईने सांगितल्याप्रमाणे मी विशाखिल वाण्याकडे गेलो. त्यावेळी तो एका वैश्याच्या मुलाशी रागारागाने बोलत त्याची कान उघाडणी करीत होता. तो त्याला मोठ्यांदा म्हणत होता, "मूर्खा, आजपर्यंत तुला मी वेळोवेळी व्यापाराकरिता पुष्कळ भांडवल दिले, पण तू डोकं ठिकाणावर ठेवून, कौशल्यानं व्यापार करून ते भांडवल वाढविलं नाहीस. उलट तू ते भांडवलच गमावून बसलास. अरे, शहाणा माणूस कुठल्याही भांडवलावर उद्योगधंदा करू शकतो आणि आपले हित साधू शकतो. तो बघ समोर एक उंदीर मरून पडलाय. तो मेलेला उंदीर हेच भांडवल समजून एखादा चतुर वाणी खासच श्रीमंत होईल!"

असे विशाखिलाचे शब्द ऐकून मी चटकन पुढे झालो आणि त्याला म्हणालो, " महाराज, तुम्ही अगदी योग्य बोललात. मी हा मेलेला उंदीर तुमच्याकडून भांडवल म्हणून घेतो." असे बोलून मी तो मेलेला उंदीर घेतला. आणि तो आपल्या खाती मांडावयास सांगून मी तेथून निघालो. माझे ते

वेडगळपणाचे कृत्य पाहून तेथे जमलेले लोक खो, खो, करून हसू लागले. त्यांच्याकडे मुळीच लक्ष न देता मी तेथून सरळ बाजारात गेलो. तिथे एका मोठ्या वाण्याला त्याच्या मांजराकरिता म्हणून मी तो उंदीर दोन मुठी चण्याला विकला. नंतर मी घरी गेलो. चणे भाजून त्याचे फुटाणे केले. नंतर एक पाण्याची घागर आणि ते फुटाणे घेऊन नगराबाहेर गेलो.

तिथे रहदारीच्या मार्गावर एका पिंपळवृक्षाच्या सावलीत मी बैठक मारली. त्या ठिकाणी अरण्यातून लाकडांच्या मोळ्या डोक्यावर घेऊन येणारे मोळीवाले, थकल्यामुळे, विश्रांती घेण्यासाठी आपल्या डोक्यावरील मोळ्या खाली ठेऊन सावलीत बसत असत. त्यांना मी मोठ्या आपुलकीने थोडेसे फुटाणे व थंड पाणी देऊ लागलो तेव्हा तृप्त झालेले मोळीविके मला आपल्या मोळीतील दोन दोन लाकडे देऊ लागले. संध्याकाळी मी त्या सर्व लाकडांची मोळी बांधून बाजारात जाई आणि ती विकून त्या पैशाचे पुन्हा चणे विकत घेई. दुसऱ्या दिवशी पुन्हा चण्याचे फुटाणे करून आणि पाणी घेऊन मी त्याच झाडाखाली बसे. त्या दिवशी माझ्यापाशी जास्त फुटाणे असल्यामुळे मला जास्त लाकडे मिळत.

असा माझा उपक्रम काही दिवस चालला. माझ्यापाशी पुष्कळ लाकडे जमू लागली. पुढे झालं काय की दोन तीन दिवस खूप पाऊस पडला. त्यामुळे जळण मिळेनासे झाले. सर्पणाचा भाव वाढला. त्या उद्योगात मला खूपच फायदा झाला. नंतर मी एक दुकान विकत घेतले. व मोठ्या चातुर्याने व्यापार करून मी एक धनाढ्य व्यापारी झालो. मग मी एक सोन्याचा उंदीर तयार करून घेतला आणि तो मोठ्या आदराने विशाखिलास परत दिला. तेव्हा त्याला फार आनंद झाला. व त्याने आपल्या मुलीचा विवाह माझ्याशी करून दिला. जन्मापासून मी दरिद्री होतो. पण मोठ्या चातुर्याने व काटकसरीने व्यापार करून आज मी मोठा लक्ष्मीवंत झालो आहे. एका मेलेल्या मूषकाच्या भांडवलावर व्यापार करून मी श्रीमंत झालो, म्हणून लोक मला 'मूषकवाणी' असे म्हणतात.''

अशी मूषकवाण्याची कथा ऐकून त्याच्या मित्रास आश्चर्य वाटल्यास नवल ते काय!

# भक्तीचा प्रसाद

उज्जयिनी नावाच्या महानगरात महासेन नावाचा एक राजा राज्य करीत होता. तो दयाळू व प्रजाहितदक्ष होता. आपल्याला एखादे खड्ग व अनुरूप भार्या या दोन गोष्टीचीच उणीव आहे असे त्याला वाटले. तेव्हा या दोन बहुमोल वस्तूंच्या लाभाकरिता चंडिकेची उपासना करावी असे त्याने ठरविले. त्या प्रमाणे चंडिकेच्या मंदिरात जाऊन त्याने उपोषण करीत पुष्कळ दिवस चंडिकेची भक्ती केली. परंतु देवी प्रसन्न होत नाही असे पाहून, त्याने आपल्या अंगाचे मांस काढून त्याचे हवन करण्यास सुरुवात केली. तेव्हा देवी प्रसन्न झाली. आणि त्याला म्हणाली, "वत्सा, तुझ्या साहसाने मी संतुष्ट झाले आहे. हे माझे खड्ग मी तुला देते ते घे. याच्या प्रभावाने तुला कोणीही कधीही जिंकू शकणार नाही. अंगारका सुराला अंगारवती नावाची एक सुंदर मुलगी आहे. ती तुझी लवकरच भार्या होईल. मला प्रसन्न करून घेण्याकरिता तू चड म्हणजे फार मोठे कर्म केले आहेस म्हणून तू चंडमहासेन या नावाने प्रसिद्ध होशील !" असे म्हणून देवीने त्याला आपल्या हातातले खड्ग दिले व ती अदृश्य झाली.

पुढे एके दिवशी चंडमहासेन शिकार करण्याकरिता अरण्यात गेला असता एका झाडीत बसलेला एक मोठा व काळाकुट्ट रानडुक्कर त्याच्या नजरेस पडला. तो सामान्य डुक्कर असावा असे वाटून राजाने त्याच्यावर शरसंधान केले. पण अंगात घुसलेल्या तीक्ष्ण बाणांची पर्वा न करता त्या भयंकर डुकराने राजाच्या रथास एक जोरदार धक्का मारला.... आणि तो एका जवळच असलेल्या मोठ्या विवरात शिरला. ते पाहून राजा रथाखाली उतरला व त्वरेने त्या डुकराचा पाठलाग करण्यासाठी विवरात शिरला.

बराच वेळ डुकराचा पाठलाग केल्यानंतर चंडमहासेनाला एक सुंदर नगर दिसले. ते पाहून राजा चकित झाला. डुकराच्या मागे पुष्कळ अंतर चालून

गेल्यामुळे दमलेला राजा जंवळच असलेल्या एका विहिरीच्या काठावर बसला. तितक्यात आपल्या शंभर दासींच्या मेळाव्यात फिरणारी रतीसारखी दिसणारी एक सुंदर कन्या राजाच्या नजरेस पडली. त्याच वेळी त्या सुंदरीची नजर त्या राजाकडे गेली. तेव्हा राजाजवळ येऊन तिने त्याला विचारले, "आपण कोण ? इथे कसे आलात ?"असा तिचा प्रश्न ऐकून राजाने तिला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकताच ती सुंदरी भयबीत होऊन अश्रु गाळू लागली.

एकाएकी तिची तशी अवस्था पाहून आश्चर्यचकित झालेल्या राजाने तिला विचारले, "तू कोण ? कोणाची, अशी का भितेस ? तुझ्या डोळ्यात पाणी का ?" "महाराज", ती सुंदरी म्हणाली, "आपल्या रथाला जोरदार धक्का देऊन विवरात शिरलेला डुक्कर खरोखर जंगली डुक्कर नाही. तो माझा पिता अंगारक नावाचा दैत्य आहे. माझं नाव अंगारवती. माझ्या पित्याचे सर्वांग वज्रासारखे महाकठीण आहे, कोणत्याही शस्त्राचा त्याच्यावर परिणाम होत नाही. शापामुळे अशा स्वरूपात या पृथ्वीवर त्याने जन्म घेतलाय. माझ्याबरोबर असलेल्या शंभर तरुणी माझ्या दासी नाहीत तर त्या माझ्या पित्याने पळवून आणलेल्या राजकन्या आहेत. त्या माझ्या सेवेत असतात. आज माझा पिता थकलेला असल्यामुळे तुम्ही त्याच्या हातून जिवंत सुटलात. आता तो डुकराचे रूप सोडून झोपलाय. पण जागा झाल्यावर तो तुम्हाला खचित मारून टाकील. त्या भीतीने माझ्या डोळात पाणी आले."

असे त्या सुंदरीचे प्रेमळ शब्द ऐकून राजा तिला म्हणाला, "अंगारवती, तू मुळीच भिऊ नकोस. तू माझ्यावर जर खरोखरच प्रेम करत असशील तर मी सांगतो त्याप्रमाणे तू कर. तुझा पिता जागा झाला म्हणजे तू त्याच्याजवळ जाऊन रडू लाग. मग तुझा पिता तुला रडण्याचे कारण विचारील तेव्हा, तुम्हाला जर कोणी ठार मारलं तर माझी काय गत होईल ? या विचाराने मला रडू आलं, असं तू त्याला सांग. बस्स एवढं काम तू कर. म्हणजे आपल्या दोघांची इच्छा पूर्ण होईल." अंगारवतीने राजाचे ते म्हणणे मान्य केले.

नंतर राजाला जवळच सुरक्षित स्थळी लपवून अंगारवती आपल्या बापाजवळ जाऊन रडत बसली. तिच्या रडण्याचा आवाज ऐकून खडबडून जागा झालेल्या दैत्याने तिला विचारले, "कां ग ! बाळे, रडायला काय झालं ?"

"बाबा," अंगारवती डोळे पुशीत म्हणाली, "तुम्हाला जर कोणी ठार मारलं तर माझी काय गत होईल, या विचाराने मला रडू येतंय." असे आपल्या मुलीचे शब्द ऐकून अंगारकासुर मोठ्यांदा हसला, आणि तिला म्हणाला, "अग वेडे, मला कोण ठार मारणार ? माझं सर्वांग वज्रमय आहे. माझं मर्मस्थान माझ्या डाव्या हाताच्या तळव्यात आहे. ते कोणालाच माहीत नाही. त्या मर्मस्थानाचे रक्षण मी सदैव माझ्या धनुष्याने करीत असतो."

याप्रमाणे अंगारवतीचे समाधान करून, अंगारक स्नानासाठी गेला. स्नानानंतर मौन धारण करून तो शंकराची उपासना करू लागला. गुप्तपणे लपून बसलेल्या राजाने अंगारकाचे सर्व बोलणे ऐकले होतेच. चटकन् आपले धनुष्यबाण सज्ज करून तो पुढे झाला आणि त्याने अंगारकाला युद्धाचे आव्हान दिले. पण अंगारकाला बोलावयाचे नसल्यामुळे त्याने आपला डावा हात वर करून राजाला थांबण्यास सुचविले. पण राजाने तिकडे दुर्लक्ष करून लगबगीने अंगारकाच्या तळहातावर नेम धरून बाण मारला. तेव्हा मोठी गर्जना करून अंगारक भूमीवर मरून पडला.

नंतर अंगारवती चंडमहासेन राजाबरोबर उज्जयिनीस गेली. काही दिवसांनी राजाने मोठ्या थाटात तिचे पाणिग्रहण केले. तिच्यापासून राजाला गोपालक व पालक असे दोन पुत्र झाले. पुत्रजन्माच्या आनंदाच्या प्रित्यर्थ राजाने मोठ्या उत्साहाने इंद्रमहोत्सव साजरा केला. त्यामुळे इंद्र खूष झाला. व राजाच्या स्वप्नात येऊन त्याला म्हणाला, "राजन्, माझ्या कृपेनै तुला एक निरूपम कन्या प्राप्त होईल." पुढे इंद्राच्या कृपाप्रसादाने राजाला एक कन्या झाली, तिच्या जन्माच्यावेळी आकाशवाणी झाली : 'या मुलीला मदनाचा अवतार व विद्याधर सम्राट असा दिव्य पुत्र होईल.' प्रसन्न झालेल्या वासवाच्या म्हणजे इंद्राच्या वराने ती कन्या प्राप्त झाल्यामुळे चंडमहासेनाने तिचे नाव वासवदत्ता असे ठेवले.

❦ ❦

BVBK-0402974